# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक १८/०२/२०१२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनाक १८/०२/२०१२ (का.प.क्र.३५) रोजी मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.४.०० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.पुरुषोत्तम भापकर,भा.प्र.से.,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२. स.स.श्री.राजु रामराव शिंदे
३. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
४. स.स.डॉ.खान जफर अहेमद
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
७. स.स.श्री. राजगौरव हरीदास वानखेडे
८. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
९. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
१०. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
११. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
१२. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१३. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१४. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१५. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१६. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१७. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१८. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१९. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
२०. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
२१. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२२. स.स.सौ.उर्मिला नितीन चित्ते

२३. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२४. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२५. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२६. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२७. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२८. स.स.श्री.खान जहांगिर अब्बास
२९. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
३०. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३१. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३२. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३३. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३४. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३५. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
३६. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
३७. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान
३८. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान
३९. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
४०. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४१. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४२. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
४३. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
४४. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
४५. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
४६. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
४७. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
४८. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
४९. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
५०. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत
५१. स.स.श्रीमती काळे शोभा पुखराज
५२. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव

५३. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
५४. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
५५. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
५६. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर
५७. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
५८. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
५९. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
६०. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
६१. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६२. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
६३. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
६४. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
६५. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
६६. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
६७. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
६८. स.स.श्री.जोशी संजय रामदास
६९. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
७०. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
७१. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७२. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
७३. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
७४. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
७५. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम
७६. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
०२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
०३. स.स.श्रीमती पाटील रेखा दिनकरराव
०४. स.स.श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

**चर्चा :-**

| | |
|---|---|
| श्री.मुजीब खान | : एमएच २०- ८२५० नंबरचे जीप वाहन महापालिकेचे असून जीपचा रंग बदलला खाजगी कामासाठी वापरले जात आहे ही जीप गाडी कुणाकडे वापरासाठी आहे. |
| मा.महापौर | :संबधीत अधिकारी आल्यानंतर खुलासा घेतला जाईल. |
| शहर अभियंता | :१० मिनिटीत माहिती मागवून दिली जाईल |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :विषय ५७७ प्रशासनाकडून प्रस्ताव आलेला असतांना का स्थगित ठेवला. |
| श्री.प्रफुल्ल मालानी | :पाणीपुरवठयाचा प्रस्ताव होता मंजूर करण्यास हरकत नव्हती प्रशासनाकडून खुलासा झाला की हे काम समांतर जलवाहिनीमध्ये घेतले आहे स.सदस्यांच्या आग्रहा नुसार ठेवला आहे असे म्हटले आता मा.महापौर तशी ताकीद दिली आहे प्रस्ताव योग्य असतील तरच आणावे |
| श्री.गजानन बारवाल | :मंजुर करू नये असे म्हणणे नव्हते.फक्त हा खर्च समांतर जलवाहिनीतून वसुली करावा असे म्हटले होते. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :वार्ड ९६ मधील आहे म्हणून अधिकारी यांनी सम्मती दिली नाही का? |
| श्री.गिरजाराम हळनोर | :स.सदस्य श्री.मनीष दंहीहंडे यांचे वार्डातील असाच प्रस्ताव होता ते काम समांतर मध्ये होणार आहे म्हणून रद्य केला होता.प्रशासन असा दुजाभाव का करते. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :समांतर जलवाहिनी होइ्ल वेळ आहे पाणीपुरवठयाचा प्रस्ताव आहे मंजूर करावा हा खर्च समांतर मध्ये होणार असेल तर त्यावेळी वसुल करावा. |
| श्री.गिरजाराम हळनोर | :हा खर्च समांतर मधून वळती करणार आहेत का ? |
| श्री.मीर हिदायत अली | :हा खर्च समांतर मधून वसुल करून घ्यावा. |
| मा.महापौर | :हा विषय मंजूर हा खर्च समांतर जलवाहिनीच्या खर्चातून वसुल करण्यात यावा. |

**<u>विषय क्रमांक ५७७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९६ अंतर्गत हमालवाडा भागात नविन १०० व १५० मि.मी.व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहीनी टाकणे आहे. त्यासाठी अंदाजपत्रक महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाची सन २००९-१० च्या दरसुची नुसार रक्कम रूपये २२,३३,५८८/- एवढयाचे तयार करण्यात आले. या कामाचा खर्च भांडवली कामे पाणी पुरवठा वार्ड-फ या लेखाशिर्ष मधुन करण्यात येणार आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त, याची दिनांक ०६.१०.२०११ नुसार मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्या अनुषंगाने ई निविदा विभागाकडून निविदा मागविण्यात आल्या असता त्या खालील प्रमाणे आहे.

१. मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स - अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.९९% जास्त दराने
२. श्री.एस.बी.साधवाणी - अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.००% जास्त दराने
३. मे.एल.के.कन्ट्रक्शन - अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.८६% जास्त दराने
४. श्री.पी.बी.पाटील - अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३९.९९% जास्त दराने

ई-निविदा कडून एकुण चार निविदा प्राप्त झाल्या. त्यामध्ये सर्वात कमी दर हा मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स- यांचा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.९९% जास्त दराची निविदा प्राप्त झाली. त्यास वाटा घाटी आंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.००% जास्त दराच्या निविदेस मा.आयुक्त यांची दिनांक १६.१२.२०११ रोजी मान्यता झालेली आहे.करीता मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांनी दिलेल्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.००% जास्त दराची निविदेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.९६ अंतर्गत हमालवाडा भागात नविन १०० व १५० मि.मी.व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहीनी टाकणे रक्कम रूपये २२,३३,५८८/- च्या अंदाजपत्रकास व मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांनी दिलेल्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.००% जास्त दराची निविदेस.तसेच सदरील खर्च हा संमातर जलवाहिनी योजनेच्या खर्चातून वसुल करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :-**

श्री.गिरजाराम हळनोर :स.मनीष दहीहंडे यांचे वार्डातील असाच पाणीपुरवठया संबधीत विषय होता नामंजूर केला तो प्रस्ताव सादर करून त्यासही मंजूरी दयावी.

श्री.प्रफुल्ल मालाणी :१ एप्रिल पासून समांतर जलवाहिनीचे काम हॅंडवर्क करणार त्याअगोदर हे काम होणार का?

कार्य.अभियंता-पापू :समातंर जलवाहिनी मध्ये शहरातील सर्व प्रकारच्या डिस्ट्रीब्यूशन लाईन कव्हर केल्या ज्या ज्या ठिकाणी डिझाईन व हायड्रोलिक पध्दतीने बदल करणार आहेत स्थायी समितीने सुध्दा ठरावात म्हटले की यानंतर अशी कामे महापालिकेने करू नये.

श्री.मुजीब खॉन :यापूर्वी काही कामाचे टेंडर कॉल कसे केले.

कार्य.अभियंता (पापू) : अतिमहत्वाची जी कामे आहे ती करावी लागतात थांबविता येत नाही.

श्री.मीर हिदायत अली :डांबरीकरणाचे कामाचे टेंडर काढले होते त्या बाबतीत कोर्ट प्रकरणा झाले मा.न्यायालयाने ते काम रिकॉल करावे डायरेक्शन दिले काय कार्य कार्यवाही केली.

श्रीमती सविता घडमोडे : वार्ड क्र. ७७ मध्ये वेळेवर व पुरेसे पाणी येत नाही रात्री बेरात्री पाणी येते या वार्डात पाणी समस्या सोडवावी.

श्रीमती प्रिती तोतला :गुंलमंडी वार्डात माळीवाडा भागासाठी दीड वर्षापासून पाईपलाईन टाकली जोडणी करण्याचे राहिले ते त्वरीत करावे या भागातील पाणी पुरवठा सुरळीत करावा.

कार्य.अभियंता (पापू) : वार्ड ७७ मध्ये नवीन लाईन टाकली आहे ती चालू झाल्यानंतर प्रश्न सुटेल.लगेच यामध्ये लक्ष घालून कार्यवाही केली जाईल.

श्रीमती.साधना सुरडकर :यापूर्वी सुध्दा अनेक भागात कमी दाबाने पाणी येत होते आमच्याकडील टाकी १ मीटर भरते त्यामूळे २० मिनिटे पाणी तेही कमी दाबाने येते वार्ड ८८ मधून पाण्या विषयी तक्रारी आल्या आजही विश्वभारती कॉलनी व इतर भागात पुरेसे व वेळेवर पाणी येत नाही. अनेक वॉल मधून पाणी गळती होते लाईनमनला सांगूनही कार्यवाही होत नाही.टाक्या भरतात त्या लाईनवरील सर्व लिकिजेस बंद करावे.

श्री.गिरजाराम हळनोर :टाक्या भराव्या त्यानंतर वॉल उघडावे असे ठरले होते काही दिवस टाक्या व्यवस्थीत भरल्या आता पुन्हा कुठेतरी छेद लागतो विश्वभारती व इतर ठिक्ाणी टाक्या २ ते अडीच मीटरवर पुन्हा वॉल ओपन केले जात आहे तसे होवू नये लिकीजेस असेल ते बंद करावे टाक्या भरतील याकडे लक्ष दयावे.

कार्य.अभियंता (पापू) :१-२ दिवसात पाण्याचा प्रश्न सुटेल.

श्रीमती आशाबाई मोरे :वार्ड ९७ मध्ये उंच भाग असल्याने पाणी चढत नाही लाईन दुरूस्त करावी जी नवीन लाईन टाकली ती सुरू करावी.

श्री.नासेर खॉन :दोन वर्षात प्रश्न मांडून पाणी समस्या दूर झाली नाही. पाण्या विषयी अनेक तक्रारी आल्या कार्यवाही होत नाही. स.सदस्य सभागृहात पोटतिडकिने बोलतात थातूर मातून उत्तरे मिळतात सभा संपते त्यानंतर पुन्हा कार्यवाही होत नाही.ज्यांनी प्रश्न माडले त्यांचे वार्डातील पाणी प्रश्न सोडण्यासाठी ठोस निर्णय घ्यावा.

श्री.मुजीब खान :रोषण गेट चप्पाचौक परीसरात १५-२० दिवसापासून घाण पाणी येते. नागरीकांना बाहेरून पाणी आणावे लागते नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण होवू शकतो.कर्मचारी आले काम पुर्ण केले नाही येत असलेले घाण पाणी बंद करावे त्या भागात पाणी दयावे.

कार्य.अभियंता (पापू) :२-३ महिणे चांगला पाणीपुरवठा सुरू होता आता उन्हाळा सुरू झाला पाण्या बाबत योग्य नियोजन करून प्रश्न सॉल केले जातील स.सदस्य श्री.नासेर खॉन यांचे वार्डातील दोन तक्रारी होत्या एक तक्रार सॉल केली

श्री.नासेर खॉन :समतानगर,मोठा-छोटा तकीया ,नुतनकॉलनीमध्ये पाणी येत नाही अनेकदा निदर्शनास आणून दिले कार्यवाही केली नाही.

मा.महापौर :जे प्रश्न पाण्या विषयी उपस्थित झाले त्या त्या भागात संबधीत अधिकारी यांनी पाहणी करून पाणीपुरवठा सुरळीत करून दोन दिवसात अहवाल माझेकडे सादर करावा.

श्री.मीर हिदायत अली : रस्त्याचे कामाचे १५ कोटीचे टेंडर काढले काही लोक मा.न्यायालयात गेले मा.न्यायालयाने परत टेंडर काढावे.निर्देश दिले काय चुक झाली होती माहिती दयावी.

शहर अभियंता :३१ तारखेला निविदा काढल्या होत्या तिसरा व्यक्ती त्या विरोधात मा.उच्च न्यायालयात त्यांनी रिट पीटीशन दाखल केले मा.न्यायालयाने ते रिट नामंजूर केले परंतु टेंडर ओपन केले तेंव्हा एकच एजन्सी होती स्पर्धा न झाल्याने मा.न्यायालयाने रिकॉल करावे असे म्हटले.

श्री.मुजीब खान : असे अनेकदा झाले फेवरच्या लोकांना कामे दिली जातात मनमानी करीत आहे प्रोसेस पुर्ण करीत नाही दुस-यांना घेवू देत नाही ज्यांना देतात त्यांचेसाठी कोणत्याही अटी शर्ती नसतात याकडे मा.आयुक्त यांनी जातीने लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.कृष्णा बनकर :लाईटचे काम दिलेली एजन्सी वार्डात काम करीत नाही त्याच एजन्सीला पुन्हा वाटाघाटीकरून काम दिल्याचे कळते ते दिलेले काम

रद्य करावे या एजन्सी काम घेतात दुस-यांना देतात वेळेवर काम करीत नाही जास्तीत जास्त ठेकेदारांना बोलवून चांगले काम होईल स्पर्धा होईल त्या प्रमाणे काम दयावे

श्री.गिरजाराम हळनोर :वार्डाची हद्य निश्चित करून २-३ वार्ड मिळून एका एजन्सीकडे लाईटचे काम दयावे वेळेवर होतील.

श्री.खाजा शरफोद्यीन :माझ्या वार्डात लाईट बंद असल्याचे मी २४ पत्र दिले काम होत नाही किती लाईट लावले किती चालू आहे रेल्वेस्टेशन पर्यत जवळपास सर्वच लाईट बंद आहे.

श्री.मुजीब खान :लाईटचे कामाकडे देखरेख करण्यास कुणी नाही.किती लाईट चालू किती लावले गॅरंन्टी किती दिवसाची आहे आठ दिवसात लाईट बंद पडण्याचे कारण काय ?

श्री.मीर हिदायत अली : डीएसआर बाजूला ठेवून पाणीपुरवठयाचे चार कामाचे अंदाजपत्रक तयार केले टेंडर मागविले.१०० एमएम लाईनचे रेट ९७५ व १५० एमएम चे १४३४ रनींग मीटर असतांना १०० एमएमसाठी १२६२ रू १५० एमएम लाईनचे १८३८रू प्रमाणे आले एक कोटीचे काम आहे यात २५ लक्षचा भ्रष्टाचार आहे.या बाबतीत मा.आयुक्तांनी यात लक्ष घालून तपासणी करावी जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी.

शहर अभियंता :यामध्ये आपण डीआयके-९ डीआयके-७ या पाईपचा उपयोग करीत आहोत.यामध्ये कंपनी रेट घेतले आहे जे कंपनीकडून पर्चेस करतो जर कंपनीकडून डीएसआर प्रमाणे रेट घेतले २५टक्के अबोव्ह येते

श्री.मीर हिदायत अली :कंपनीचे रेट हे अबाऊच आले आहे.

श्री.मुजीब खान :हे टेंडर रद्य करावे. नुकसान होणार नाही याची दखल घ्यावी.

शहर अभियंता :रिटेंडर केले तर आणखी जास्त खर्च वाढेल.

श्री.मीर हिदायत अली :२५ लक्ष वाचणार असेल तर रिकॉल करावे पुन्हा टेंडर मागवावे.०२ दिवसाची अल्प मुदतीची निविदा मागविता येते.

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी या संदर्भात तपासणी करून योग्य निर्णय घ्यावा.

श्री.गिरजाराम हळनोर :विषय क्र.५७७ कडे वळू इच्छितो २२ लाखाचे टेंडर आहे.

यावेळी अनेक .स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.मुजीब खान :चौकशी करावी. हया कामाचे टेंडर पुन्हा मागवावे.

श्री. मीर हिदायत अली :डि एस आर न वापरता केले माझ्या मते मा.आयुक्त याची मंजूरी घेतली नाही चार कामाचे टेंडर मागविले २५ लक्ष जास्त जात आहे कंपनीचे रेटप्रमाणे घेतो जास्त होतात रिकॉल करावे संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.प्रमोद राठोड :डांबरीकरणाच्या कामाबाबत कोर्टाने ताशेरे ओढले आहे अटी शर्ती नुसार का कार्यवाही होत नाही.डांबरीकरणात कोण दोषी आहे.

श्री.मुजीब खान :रिकॉल करावे. आपण जबाबदारी घेत असेल तर सर्वांना उत्तर दयावे लागेल.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.राजू शिंदे :एखादया कामात नुकसान होणार असेल व सभागृहाचे मत असेल ते काम रिकॉल करावे यापूर्वी अनेक कामाचे टेंडर रिकॉल केले मनपाची आर्थीक परीस्थिती सुधारत असेल तर रिकॉल करावे.लाईटचे टेंडर काढले कामे झालेली नाही त्याच पध्दतीने हा अवलंब करीत आहोत ५ लक्षचे काम असेल तर टेंडर काढले पाहिजे ए-१ रेटलिस्ट व इतर कामामध्ये अनेक रक्कम जात आहे कामे होत नाही. बोगस काम होते. त्यासाठी ए-१ रेटलिस्टची कामे बंद करावी प्रत्येक वार्डात मेन्टनंन्स साठी ५ लक्ष ठेवावे.यामूळे १० कोटी रूपये महापालिकेचे वाचणार आहे.५ लक्ष मध्ये त्या वार्डात देखभाल दुरूस्तीची कामे मार्गी लागतील. अडचण येणार नाही.

मा.आयुक्त :अंदाजपत्रकाच्या बाबतीत जो प्रश्न समोर आला किंवा इतर काम असतील हे कांपेटन्ट एजन्सीकडून तपासून घेणार.

श्री.मीर हिदायत अली :जर यात फायदा होत असेल तर रिकॉल करावे डीएसआर रेट बाजूला ठेवून कंपनीचे रेट घेतले.

मा.महापौर :इंजिनिअरींग कॉलेज कडून यांची तपासणी करून घ्यावी.

श्री.गिरजाराम हळनोर :कॉलीटी मेंन्टन करणार नाही व कंपनीकडून वेगळे रेट का मागविले आपल्याकडे वेगळे रेट व या कामासाठी वेगळे रेट लावल्या गेले याची तपासणी मा.आयुक्तानी करावी.

मा.महापौर :या बाबतीत टेंडर रिकॉल करता येईल.

श्री.राजू शिंदे :लाईटचे टेंडर काढले कुठे ही काम होत नाही त्यामूळे तेही रद्य करावे

श्री.गिरजाराम हाळनोर :महापालिकेने हायड्रोलिक पध्दतीने लाईट पर्चेस करावे व सर्व काम महापालिकेने करावे लाईनमन मनपाचे आहे.

मा.महापौर :लाईटचे टेंडर हे वार्डवाईज काढण्यात यावे.

श्री.राजू शिंदे :लाईट व मेंन्टनन्सचे कामाचे ६७ सी प्रमाणे मा.आयुक्ताच्या अधिकारात ९९ वार्डाचे टेंडर काढण्यात यावे काम दयावे.

श्रीमती पुष्पा सलामपुरे :माझ्या वार्डात साफसफाई होत नाही मजूर कर्मचारी कमी आहे लाईट बंद आहे ड्रेनेजचे काम होत नाही सफाई साठी महिला कर्मचारी देण्यात यावे.

श्रीमती छाया वेताळ :माझ्या वार्डात लाईटचे काम वारवांर सांगूनही होत नाही श्री.देशमुख यांना प्रत्यक्ष सांगितले,आले नाही.दोन दिवसापुर्वी एका मुलाला लाईटचा शॉक लागून तो जखमी झाला.

श्री.गिरजाराम हळनोर :लाईट विभागाचे खाजगीकरण करून सुध्दा अधिकारी यांना स.पदाधिकारी स.सदस्य यांनी बोलविले तरी भेटत नाही लाईनमन व अभियंते कोणती कामे करतात.

यावेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :संबधीत ठिकाणी अधिकारी यांनी पाहणी करून त्वरीत कार्यवाही करावी.

श्री.गिरजाराम हळनोर :लाईट सेक्शनचे कर्मचारी कोणाचेच ऐकत नाही.

श्रीमती छाया वेताळ :१००-१५० लाईट माझ्या वार्डात बंद आहे श्री.देशमुख यांना अनेकदा सांगितले र्कावाही केली नाही अधिकारी कर्मचारी महिला सदस्यांचे ऐकत नाही.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी डायस समोर बोलत असतात.

मा.आयुक्त :लाईटच्या ज्या तक्रारी आहे त्या सोडविण्याकडे संबधीत जे उपअभियंता व इतर जे. ई आहे त्यांनी दुर्लक्ष केले त्या प्रत्येकांना १०००० रू दंड करण्यात येतो श्रीमती छाया वेताळ यांचे वार्डात श्री.सिकदंर अली हे लाईट समस्ये बाबत पाहणी करून कार्यवाही करतील व इतर भागात ३ दिवसात संपुर्ण तपासणी करून लाईट बाबत आवश्यक कार्यवाही होईल.

श्रीमती साधना सुरडकर:ग्रुप हौसींगच्या संदर्भात यापुर्वी चर्चा झाली एक कमेटी नेमली त्या कमेटीने ग्रुप हौसींगच्या विकासामध्ये काय तृटया आहेत प्रत्यक्ष जाऊन बघणार होते.यास २-३ महिणे झाले त्या समितीने काय निर्णय घेतला गृह प्रकल्प करणा-या व्यक्तीला काही आदेश किंवा करण्याचे सांगितले आजही गृहप्रकल्पातील नागरीकांना सुविधा मिळत नाही.जी समिति केली कोणती  कार्यवाही केली.

श्री.गिरजाराम हळनोर :ज्या बिल्डरांनी बांधकाम केले त्यांनी सेल्प डेव्हलपमेंन्टचे ॲग्रीमेन्ट महापालिकेशी केले होते.ज्या सुविधा देणार होते दिल्या नाही भोगवटा प्रमाणपत्र घेतले नाही.ॲग्रीमेट असे केले की पुढील मेन्टनन्सचे काम तेथे राहणारे लोक करतील परंतु तेथे कोणत्याही सुविधा दिलेल्या नव्हत्या.ज्या लोकांनी घरे घेतली त्यांना करारनामा काय झाला माहित नव्हते. अशा अनेक ठिकाणी इमारती झाल्या त्याची तेथे पाहणी करून त्या विकासकांनी किती काम केले किती बाकी आहे प्रशासनाने नंतर काय केले याची चौकशी करून अहवाल देण्यासाठी समिती नियुक्त केली होती.ती माहिती दयावी.

श्री.गजानन बारवाल :समिती गठीत झाली नाही असे वाटते पुढील बैठकीत माहिती देण्याचे आदेशीत करावे.

मा.महापौर :पुढील सभेत या विषय सविस्तर माहिती देण्यात यावी.

**विषय क्र. :- ५८५**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा. मुख्य सचिव यांच्या दि. ३०/०३/२०११ च्या पत्रकानुसार (सोबत संलग्न) बाल कामगार, बाल भिक्षेकरी, रस्त्यावरील एकही बालके यांच्या पुनर्वसनासाठी आयुक्त यांनी संबंधीत स्वयंसेवी संस्थाच्या प्रतिनीधींसोबत चर्चा केली असता.

Already हे काम विविध बालकाश्रम, अनाथाश्रमाद्वारे केले जाते व 'डे केअर सेंटर' ची संकल्पना पुढे आली.

या डे केअर सेंटरमध्ये धुणी-भांडी करणाऱ्या,मातीकाम करणाऱ्या व कामानिमित्त दिवसभर घराबाहेर राहणाऱ्या महिलांच्या १ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांचा सांभाळ स. ९:०० ते सायं. ६:०० या वेळेत केला जातो.येथे बालकांचा शिक्षण, आरोग्य, आहार व मनोरंजन या चार हक्कांचे संगोपन केले जाते. सध्या प्रायोगीक तत्त्वार मोतीकारंजा शाळा व नारेगाव

बालवाडी या दोन ठिकाणी महानगरपालिकेच्या उपलब्ध इमारतींमध्ये आवश्यक त्या दुरुस्तीनंतर डे केअर सेंटर्स दि. २४/०८/२०११ पासून प्रशासकीय मान्यतेनंतर सुरु करण्यात आले आहेत. सदरील डे केअर सेंटर्स निवड समितीने निवडलेल्या पात्र संस्था, आपुलकी समाज सेवा व ग्राम विकास संस्थाद्वारे चालविले जाते.

या ठिकाणी एक अधिक्षक, एक सेवक, एक स्वीपर, एक शिक्षीका व २५ बालकांमागे एक सांभाळ करणारी महिला असा स्टाफ अशा एकूण शंभर मुलांसाठी आहारसहीत (दोन वेळा नाष्टा व दुपारचे जेवण) रू. १,९१,०००/- प्रति डे केअर सेंटर खर्च असून रू. १,७५,०००/- प्रति महिना प्रति डे केअर सेंटर महानगरपालिका द्वारे करण्यात येतो व उर्वरीत जास्तीचा खर्च संस्थेद्वारे करण्यात येतो. बालकांच्या संख्येनुसार देय देयक अदा करण्यात येते.

या 'डे केअर सेंटर्स' साठी मा. मुख्य सचिव यांनी औरंगाबाद महानगरपालिकाचे कौतुक केले असून (प्रत संलग्न) इतर महानगरपालिकांमधून असा प्रकल्प राबविण्याचे सुचविले आहे.

करीता सदरील प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव व या बाबत आवश्यकतेनुसार डे केअर सेंटर्सची संख्या वाढविणे किंवा त्या संबंधीत पुढील नियमीत कार्यवाहीचे अधिकार आयुक्त यांना प्रदान करणेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.गिरजाराम हळनोर :यापुर्वी योजने मध्ये ठरल्या प्रमाणे या कामाच्या बाबतीत सुध्दा जे डे केअर सेंटर नाईट सेंन्टर चालणार आहे यांचे सुध्दा कामकाज आपण सकाळी दिलेल्या निर्णयाप्रमाणे तया समितीच्या अंतर्गत त्यांना विश्वासात घेवून ही कार्यवाही करावी .अशी यात दुरूस्ती करून हा ठराव मंजुर करावा.

श्री.गजानन बारवाल : डे केअर योजना ही संकल्पना प्रशासनाची चांगली आहे आपुलकी समाज सेवा व ग्राम विकास संस्थाव्दारे चालविले जाते जे रस्त्यावर फिरणारे बालक असेल इतर बालके असतील किंवा काम करणारे बालक असतील त्यांचे सगोपन करण्यासाठी ही संकल्पना आहे.याची संख्या जास्त आहे किती सेंटर उभारवयाची किती खर्च लागणार आहे. व कोठे उभरणार आहे हे सर्व यात यायला पाहिजे.

महापौर :पुढील सभेत या विषयी सविस्तर माहितीचा अहवाल सादर करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोतीकारंजा शाळा व नारेगाव बालवाडी या दोन ठिकाणी महानगरपालिकेच्या उपलब्ध इमारतींमध्ये आवश्यक त्या दुरुस्तीनंतर डे केअर सेंटर्स दि. २४/०८/२०११ पासून सुरू करण्यास व या ठिकाणी एक अधिक्षक, एक सेवक, एक स्वीपर, एक शिक्षीका व २५ बालकांमागे एक सांभाळ करणारी महिला असा स्टाफ अशा एकूण शंभर मुलांसाठी आहारसहीत (दोन वेळा नाष्टा व दुपारचे जेवण) रू. १,९१,०००/- प्रति डे केअर सेंटर खर्च असून रू. १,७५,०००/- प्रति महिना प्रति डे केअर सेंटर महानगरपालिका द्वारे करण्यात येतो व उर्वरीत जास्तीचा खर्च प्रस्तावात नमुद संस्थेद्वारे करण्यास तसेच आवश्यकतेनुसार डे केअर सेंटर्सची संख्या वाढविणे किंवा त्या संबंधीत पुढील नियमीत कार्यवाहीचे अधिकार आयुक्त यांना प्रदान करणेच्या कार्योत्तर प्रस्तावास मंजुरी देण्यात येते तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार किती सेंटर उभारावयाची किती खर्च लागणार आहे. व

कोठे उभारणार आहे या बाबत सविस्तर माहितीचा अहवाल पुढील सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यासही मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.:- ५८६**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि. २६/०८/२००९ च्या मा. महिला व बाल कल्याण समितीने प्रत्येक वॉर्डमध्ये पात्र लाभार्थीसाठी पाच व एडस् बाधित कुटुंबातील महिलांसाठी पिको-फॉल शिलाई मशीन्स वितरीत करणे बाबतचा ठराव घेण्यात आलेला आहे.

(१०४ x ५ = ५२० मशीन्स) व एडस्बाधीत कुटुंबातील महिलांसाठी ५२ अशा एकूण ५७२ पिको-फॉल मशीन्स पात्र महिलांना वितरीत करणे आहे. (पात्र महिलांच्या अटी व शर्ती ठरावात नमुद आहेत.)

जाहीर निवीदाद्वारे फुट ऑपरेटेड (इलेक्ट्रीक मोटार विरहीत) पिको-फॉल शिलाई मशीनसाठी खालील प्रमाणे एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| i.रवि एजन्सीज् | - | रु. ७२२०/- प्रति नग. |
| ii. के. सी. सुर्यवंशी ॲन्ड सन्स. | - | रू. ६,८८५/- प्रति नग. |
| iii. कविता एजन्सीस्. | - | रू. ७,१५०/- प्रति नग. |

उपरोक्त दरांपैकी के. सी. सुर्यवंशी ॲन्ड सन्स या एजन्सीचे दर रू. ६,८८५/- प्रति नग हे न्युनतम असून त्यानुसार ५७२ मशीन्ससाठी एकूण खर्च रू. ३९,३८,२२०/- येत आहे.

तथापी तीनही एजन्सीने जे Samples विभागाकडे दाखल केले आहेत ते Samples निवीदा फॉर्ममध्ये नमुद केलेल्या मानकानुसार व अटीनुसार आहेत की नाही याबाबत तपासणीसाठी शासकीय औद्योगीक प्रशिक्षण केंद्राकडे दि. ०९/०१/२०१२ रोजी पत्राद्वारे मागणी कली आहे.

या तपासणी अहवालात नमुद केल्याप्रमाणे जे Samples निवीदा फॉर्ममधील अटी पूर्ण करते व अशा अटी पुर्ण करणाऱ्या Samples च्या ज्या एजन्सीचे दर कमी आहे त्यांना काम देण्याच्या आधीन राहुन सदरिल प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**चर्चा :**

श्री.राजू शिंदे : पिको फॉल शिलाई मशीन कोणत्या कंपनीच्या घेणार आहे तसेच हे तीनही टेंडर एकाच व्यक्तीने दिले आहे असे वाटते. उषा सारख्या ब्रॅण्डेड कंपनीचे कोटेशन घेवून त्या कंपनीला काम दयावे हे टेंडर रद्य करावे किंवा रिकॉल करावे

श्री.गजानन बारवाल :२ वर्षापासून पिको फॉल मशीन वाटप केल्या नाही महिलांना रोजगार मिळेल यावर सहानुभूतीपुर्वक विचार करावा.

श्री.अमीत भुईगळ :पिको फॉल मशीन बाबत मी मागच्या वेळेस अक्षेप घेतला जी निविदा आली होती त्याची चौकशी करण्या बाबत निवेदन दिले मा.आयुक्तांनी चौकशी केली व चौकशीत असे निष्पन्न झाले की श्री.सुर्यवंशी हे त्या शिलाई मशीनला आयएसआय मार्कचे डुप्लीकेट स्टिकर लावतात चायनीज मशीन देतात जे टेंडर आले ते रद्य करावे.

श्री.राजू शिंदे :५ ऐवजी ४ द्याव्यात परंतु चांगल्या कंपनीच्या, कॉलीटीच्या मशीन दिल्या जाव्यात.मेंन्टनन्स खर्च करण्याला परवडले पाहिजे. चांगल्या कंपनीच्या देण्यात याव्यात.

श्रीमती हेमलता मुगदिया:उषा कंपनीच्या शिलाई मशीन घ्याव्यात.

श्रीमती सविता घडमोडे :हा विषय मंजूर करावा महिला शिलाई मशीनची मागणी करीत आहे.

श्री.गिरजाराम हळनोर :जे सॅम्पल मागवले ते जर स्टॅडर्ड मटेरीयल व व्यवस्थीत असेल तर यास उशीर न होता हा विषय मंजूर करावा.स्टॅण्डर्ड कंपनीचे मशीन देण्यात यावे दोन वर्षापासून हा प्रस्ताव प्रलंबीत आहे.महिलांसाठी मदत झालेली नाही त्यांचे उपजिवीकेच्या दृष्टीने यास मंजूरी दयावी.

श्री.राजू शिंदे :चांगल्या प्रतीच्या ब्रॅण्डेड कंपनीच्या शिलाई मशीन देण्यात याव्यात हेच आमचे म्हणणे आहे.

मा.महापौर : सॅम्पल मागविलेले आहे आयएसआय मार्क ब्रॅण्डेड कंपनीचे शिलाई मशीन्स खरेदी केले जाईल हे तपासून घेतले जाईल.

श्री.राजू शिंदे :जे मार्केटमध्ये कंपनीच्या शिलाई मशीन चालतात त्याच घ्याव्यात.नसता आपल्यावर आरोप होतील

श्री.गिरजाराम हळनोर :आयएसआय मार्क व स्टॅण्डर्ड कंपनीचे माल खरेदी करावा.

श्री.प्रमोद राठोड :स्कॉर्पीओ कोणत्या कंपनीची घेणार हे टाकू शकतो तर शिलाई मशीन च्या बाबतीत का टाकले जात नाही

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी खुलासा घ्यावा.

श्री.राजू शिंदे :चांगल्या कामासाठी व शासनाचा निधी असेल तर स्टॅण्डर्ड घ्यावे तपासणीची गरज नाही कंपनीचे नाव यात नाही.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.प्रफुल्ल मालानी :कंपनीचे नाव ठरावात नेहमीच दिले जात नाही.

मा.महापौर :कोणत्या ब्रॅन्डेड कंपनीचे घ्यावे स.पदाधिकारी ठरवतिल त्याचे सॅम्पल येईल.

कक्ष प्रमुख(म.व बा.क.):हा विषय महिला व बाल कल्याण समितीत मंजूर झालेला आहे दीड वर्षापासून प्रलंबीत होता यावर अनेक ऑब्जेक्शन आले होते त्यावर एक समिती नेमली त्यानी म्हटले की जी शिलाई मशीन खरेदी करणार ती आयएसआय मार्क असावी.त्याच बरोबर मोटार दिलेली नसावी कारण त्या कंपनीची मोटार येत नाही.आर सी कमी दराने,आरसी कमी दरास काम करण्यास नकार दाखविला तिस-यांदा जाहीर प्रगटण पुन्हा निविदा मागवल्या त्यात तीन निविदा प्राप्त झाल्या आयएसआय मार्क असलेली घेणार आहोत.

श्री.राजू शिंदे :५०० पेक्षा जास्त मशीन्स घेणार आहोत चांगल्या कंपनीच्या घ्याव्यात एवढी संख्या असल्यास एखादी कंपनी बनवून देईल.सर्व चांगल्या कंपनी आहे असे बोलतात.

श्री.गिरजाराम हळनोर :टेक्नीकल खुलासा अधिकारी यांनी केला त्या आयआय मार्क आहेत की नाही योग्य पध्दतीने टेंडर आले असेल तर त्यास मंजूरी दयावी.

श्री.राजू शिंदे :चांगल्या दर्जाच्या चांगल्या कंपनीच्या असाव्यात

मा.महापौर :सर्व पदाधिकारी बसून निर्णय घेतील.

श्री.गिरजाराम हळनोर :मंजूर करावे दिलेल्या स्टॅण्डर्ड आहेत की नाही स.पदाधिकारी यांनी पहावे.

श्री.सुशिल खेडकर :ब्रॅण्डेड कंपनीच्या असाव्यात सभागृहाची भावना आहे.

मा.उपमहापौर :जे खरे लाभार्थी आहे त्यांना या शिलाई मशीन देणेसाठी स.सदस्यांनी शिफारस करावी. मागिल वेळेस एक व्यक्ती चार चाकी वाहनमध्ये शिलाईमशीन घेवून जात असतांना आढळले.

श्री.काशिनाथ कोकाटे :ख-या लाभार्थींना याचा फायदा व्हावा.स्वंयरोजगार मध्ये दोन लोकांच्या स.सदस्यांनी शिफारस केल्यानंतर अशा २०८ संचिका बाजूला ठेवून इतर लोकाच्या संचिका बँकाकडे पाठविल्या ते बाजूला ठेवून नंतरचे जे आले त्यांचे संचिका बँकाकडे पाठविल्या तो प्रकार यात होवू नये.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :सॅम्पल मागवले आहे अधिकारी चेक करतील

श्री.राजू शिंदे :आयएसओ नाही ब्रॅण्डेड कंपनीचे घ्याव्यात.सभागृहाचे मत असेल तर घेण्यास हरकत काय?

श्री.गिरजाराम हळनोर :आयएसआय मार्क असलेल्या व स्टॅर्डड कंपनीच्या घ्याव्यात.

श्री.राजू शिंदे :नाही हा ठराव रद्य करावा आयएसओ असलेल्या घेवू नये.

मा.महापौर :हा विषय मंजूर करण्यात येतो.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी डायस समोर बोलत असतात.

श्री.राजू शिंदे :मा.आयुक्तांना योग्य वाटते का, खुलासा घ्यावा.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महिला व बाल कल्याण समितीने प्रत्येक वॉर्डमध्ये पात्र लाभार्थीसाठी पाच व एडस् बाधित कुटुंबातील महिलांसाठी ५२ अशा एकूण ५७२ पिको-फॉल मशीन्स पात्र महिलांना वितरीत करणेसाठी प्राप्त निविदेपैकी के. सी. सुर्यवंशी ॲन्ड सन्स या एजन्सीचे दर रू.६,८८५/- प्रति नग असून यासाठी रू.३९,३८,२२०/- खर्च येत असुन सॅम्पल निविदा फार्ममध्ये नमुद केलेल्या मानकानुसार व अटीनुसार असल्याचे तपासणी करून तपासणी अहवालाप्रमाणे जे सँपल निविदा फार्ममधिल अटी पुर्ण करते व अश्या अटी पूर्ण करणा-या Sample च्या ज्या एजन्सीचे दर कमी आहे त्यांना काम देण्यास तसेच पिको-फॉल मशीन्स आयएसआय मार्क ब्रॅन्डेड कंपनीचे असल्या बाबत स.पदाधिकारी यांनी खात्री करून घेतल्या नंतर खरेदी बाबतची कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. :- ५८७</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की वॉर्ड क्र. ०३ यादवनगर अंतर्गत सेक्टर ई मध्ये रस्त्याचे कॉक्रीटींग करणे आवश्यक आहे त्यास्तव या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या दरसूची सन २०१०-११ नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे रस्ता ठिकठिकाणी नादुरूस्त झाला असुन त्यामुळे नागरीकांची विशेषत: वाहन धारकांची गैरसोय होत आहे त्यास्तव कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.३७,३८,५३८/- प्रशासकीय मंजुरीस्तव प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक १.११.२०११ रोजी प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्यांत आले आहे. सदर अंदाजपत्रकासाठी अर्थसंकल्प २०११-१२ मधील नवीन कॉक्रीट रस्ते

या लेखा शिर्षकांअंतर्गत वळती केलेल्या तरतुदीमधुन योग्य ती तरतुद उपलब्ध करून देण्यांत आली आहे.

करिता सदर अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणे आवश्यक आहे सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनंतर पुढील योग्य ती कार्यवाही पुर्ण करण्यांत येऊन काम हाती घेण्यात येईल. करीता अंदाजपत्रक रू. ३७,३८,५३८/- यास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे वार्ड क्र. ३ यादवनगर अंतर्गत सेक्टर ई मध्ये रस्त्यांचे कांक्रीटींग करण्याकरिता अंदाजपत्रक रक्कम रू. रू. ३७,३८,५३८/-यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. :- ५८८**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की औरंगाबाद महानगरपालिका हद्यीत वार्ड क्र. ४३ शरीफ कॉलनी येथे मुस्लीम समाजाचे अरफात कब्रस्थान स्थित आहे सदर प्रकरण सहाय्यक संचालक नगररचना विभागामार्फत या विभागास प्राप्त झाले आहे या कब्रस्थानालगतच्या सहा प्रभागातील नागरिकाकडून वेळ प्रसंगी योग्य तो उपभोग केला जातो. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे सदर कब्रस्थानची जागा अत्यंविधीसाठी अपुरी पडत आहे जागेची पाहणी केली असता येथे उत्तर पूर्व बाजूने साधारणतः १८ मीटर रूंदीची जागा विस्तारीकरणासाठी उपलब्ध होऊ शकते. सद्यस्थितीत येथे दुहेरी कुंपन भिंत असल्याने अंत्याविधीसाठी अधिकची जागा उपलब्ध होणेसाठी जागेवरील सद्यस्थिती नुसार आतील बाजुस असलेली कुंपन भिंत जिचे मोजमाप साधारणतः१५ मीटर x २.४ मीटर उंच असुन ती सुस्थितीत आहे या शिवाय याच जागेत असलेले नादुरूस्त व मोडकळीस आलेले पत्राचे शेड (९.००X४.५० मीटर)पाण्याचा हौद २X१.५ मीटर तोडावे लागणार आहे सदरचे तोडकाम करून उपयोगी व भंगार साहित्य भांडारात म्हणजेच सिध्दार्थ उदयान येथील प्राणी संग्रहालयात मध्ये जमा करण्यात येईल तदनंतर एकत्रितरित्या जाहिर लिलावाद्वारे या भंगार साहित्याची विल्लेवाट लावता येईल.

करीता अरफात कब्रस्थान येथे अंत्यविधीसाठी अधिक जागा उपलब्ध होणेसाठी अंतर्गत भिंतीचे पत्र्याचे शेड, पाण्याचा हौद इत्यादीचे तोडण्याचे कामास मंजुरी मिळणेस्तव व यासाठी येणा-या खर्चाचा आढावा चालू दरसुची नुसार घेऊन तोडण्याचे कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे मंजुरीस्तव प्रस्ताव सविनय सादर करण्यात येतो.

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल :जागा कुणाची आहे

डॉ.जफर खॉन :शरिफ कॉलनीत अरफात कब्रस्थान असून तेथे बाजूच्या ६ वार्डातील लोक अत्यंविधीसाठी येतात.तेथे एक शेड व एक हौद आहे तेच पाडायचे आहे जागा महापालिकेचीच आहे.

मा.महापौर :विषय मंजूर

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४३ शरीफ कॉलनी येथे मुस्लीम समाजाचे अरफात कब्रस्थान स्थित असून येथे अंत्यविधीसाठी अधिक जागा उपलब्ध होणेसाठी अंतर्गत भिंतीचे पत्र्याचे शेड, पाण्याचा हौद इत्यादीचे तोडण्याचे कामास मंजुरी मिळणेस्तव व यासाठी येणा-या

खर्चाचा आढावा चालू दरसुची नुसार घेऊन तोडण्याचे कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय क्र. ५८९ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की न.भु.क्र १५७३५/७/१ क्षेत्र १०,००० चौ.मी हा भुखंड मनपास हस्तांतरीत झालेला असुन त्याची नोंद महानगरपालिका नावे आखिव पत्रिकेवर (पी.आर.कार्ड)घेण्यात आलेली आहे सदर भुखंड आरक्षण क्र. २७२ सांस्कृतिक केंद्र व उद्यान करीता आरक्षित केलेला असून भुखंडावर संतसृष्टी व उद्यान विकसित करणेचे प्रयोजन आहे सदर कामामध्ये संतसृष्टी, ध्यानगृह , ग्रंथालय या इमारतीचे बांधकाम करणे व लॅंडस्केपींग, कारंजे, अंपी थिएटर, प्रवेशद्वार व कुंपण भिंत तसेच नाला ट्रेनिंग या कामाचा सामावेश करण्यात आलेला आहे. याबाबतचे प्राथमिक नकाशे व अंदाजित खर्च बाबतचा प्रस्ताव खाजगी वास्तुविशारद श्री. प्रदिप देशपांडे यांच्या मार्फत तयार करून घेण्यात आले असुन सर्व कामांकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| १. इमारत बांधकामकरीता (बांधिव क्षेत्र २३८० चौमी)- | | १९० लक्ष |
| २. शिल्प, कांरजे , लॅडस्केपींग, अंपी थिएटर (खुले)- | | ११० लक्ष |
| ३. प्रवेशद्वार नाला रिटनिंग, कुंपण भिंत | - | ७५ लक्ष |
| ४. विद्युतीकरण | - | २५ लक्ष |
| ५. वास्तुविशारद व इतर किरकोळ खर्च | - | ३० लक्ष |
| एकूण | - | ४३० लक्ष |

वरीलनुसार संतसृष्टी व उद्यान विकसित करणेच्या कामाकरीता रू ४३०.००लक्ष खर्च अपेक्षित असुन सन २०११-२०१२ या आर्थीक वर्षात रू ७५.०० लक्षची तरतुद करण्यात आली आहे संतसृष्टीचे संपुर्ण काम हे टप्प्या- टप्प्यामध्ये करण्यात येणार असुन यामधील उर्वरीत रक्कम रू. ३५५.०० लक्ष रक्कमेपैकी भागश: रक्कम ही मनपा पुढील अर्थसंकल्पामध्ये व भागश: रक्कम डी.पी.डी.सी. मा.खासदार निधी व मा.आमदार निधी मधुन उपलब्ध करणे करीता मा.महापौर तथा संबधित वार्डाचे नगरसेवक व प्रशासना मार्फत पाठपुरावा करून निधी उपलब्ध करणार आहेत.

करीता न.भु.क्र. १५७३५/७/१ क्षेत्र १०,००० चौ.मी या भुखंडावर संतसृष्टी व उद्यान विकसित करणे बाबतचा प्रस्ताव निधी उपलब्धतेनुसार टप्प्या-टप्प्याने काम हाती घेणेच्या मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद:-**

श्री.गिरजाराम हळनोर :शहराच्या सौदर्यात भर घालणे व वेगळया प्रकारची वास्तू उभारावी या या दृष्टीने प्रस्ताव दिला मंजूर करण्यास हरकत नाही परंतु विकास कामासाठी महापालिकेकडे पैसा नाही ४३० कोटी खर्च करण्याची महापालिकेची आर्थीक स्थिती नाही म्हणून बजेट मध्ये तरतूद केली तेवढयाच रक्कमेला मान्यता दयावी व हा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.पुढचा निधी शासनाने देण्याची मागणी करावी त्या अटीवर हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.राजू शिंदे :यास शासन व डीपीडीसी निधी देणार आहे जशाच्या तसे मंजूर करावे कोणतीही अट टाकू नये.

श्री.गजानन बारवाल :७५ लक्षला मंजूरी दयावी उर्वरीत निधी शासनाने दयावा या प्रमाणे मंजूर करावे.

यावेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.प्रफुल्ल मालानी :शहराच्या विकासात भर घालणारा प्रस्ताव आहे ७५ लक्षची तरतूद केली त्यांलाच मंजूरी दयावी.

श्री.गिरजाराम हळनोर :उर्वरीत निधीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा.

श्री.राजू शिंदे :प्रत्येक वर्षी यासाठी निधी उपलब्ध करून देवू शासनाच्या मान्यतेची गरज नाही महापालिकेने करावे.

मा.महापौर :- प्रस्ताव चांगला आहे. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करण्यासाठी सुध्दा कार्यवाही करण्यात यावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न.भु.क्र. १५७३५/७/१ क्षेत्र १०,००० चौ.मी या भुखंडावर संतसृष्टी व उद्यान विकसित करणे कामाकरीता रू ४३०.००लक्ष खर्च अपेक्षित असुन सन २०११-२०१२ या आर्थीक वर्षात रू ७५.०० लक्षची तरतुद करण्यात आली असुन संतसृष्टीचे संपुर्ण काम हे टप्प्या टप्प्यामध्ये करण्यात येणार असुन यामधील उर्वरीत रक्कम रुपये ३५५.०० लक्ष रक्कमेपैकी भागश: रक्कम ही मनपा पुढील अर्थसंकल्पामध्ये ठेवण्यास मान्यता देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. :- ५९०</u>**

मा.आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, केंद्र शासन पुरस्कृत एकात्मीक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत मो. आंबेडकर नगर येथे घरकुल बांधणी करणे व विधी विविध विकास कामे करणे बाबतच्या रूपये ५,६१,५७,८०१/- या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त असुन सद्यस्थितीत विकास कामे प्रगतीपथावर आहेत सदरील योजनेच्या रस्ते बांधणी उपशिर्षातील कॉंक्रीट रस्ते बांधकामात मुख्य रस्त्यासाठी जास्त भारवहन क्षमतेच्या दृष्टीने M-३० ग्रेड पेव्हमेंट बांधणीचे अतिरिक्त बाबीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०११-१२ च्या दरसूचि नुसार रूपये २८,६७,३०६/- चे अतिरिक्त बाबीचा प्रस्ताव सादर असुन सदर खर्च हा मुळ कंत्राटदार श्री. ललित आधाने यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने मुळ निविदा तरतुदीच्या खर्चास अधिन राहुन करून घेण्यात येणार आहे तरी सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये ५,९०,२५,१०७/- चा प्रस्ताव अतिरिक्त बाबीचे अंदाजपत्रक रूपये २८,६७,३०६/- चे वाढीव काम याच कामाचे कंत्राटदार श्री.ललित आधाने यांचेकडून अ.प. दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.राजू शिंदे :सध्या सर्वेचे काम चालू आहे मतदार यादीत नांव असेल तरी त्यांचा कोणताही पुरावा आपल्याकडे व संबधीताकडे नाही त्यासाठी त्या वार्डाचे स.सदस्य किंवा बाजूच्या कुणाच्या समक्ष पंचनामा करून खरा जो लाभार्थी आहे त्यांचा समावेश करावा. दोन-पाच फुट जागा कमी जास्त असेल तर व कागदपत्र कमी प्रमाणात असेल तर खात्री करून अधिकायानी समजून घ्यावे जे खरे लाभार्थी आहे त्यांना लाभ मिळावा.

श्री.गजानन बारवाल : एम-३० काय आहे माहिती दयावी.

मा.महापौर :हा विषय नामंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव</u>**

प्रस्तुत प्रस्ताव नामंजुर करण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. :- ५९१**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन विभागासाठी अग्निशमन व आणीबाणी सेवेत काम करण्यास सुसज्ज असे लहान वाहनाची अत्यंत आवश्यकता आहे.

१. भारत सरकारच्या **आपत्कालीन व्यवस्थापन कायदा २००५** नुसार व महाराष्ट्र शासनाच्या धोरणात्मक निर्णय क्र. डीएमयु-२००६/सीआर-११/डीएम-१, मंत्रालय, मुंबई-३२, दि. २५/०७/२००६ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेने **विभागीय आपत्कालीन व्यवस्थापन केंद्र** स्थापन केलेले आहे. औरंगाबाद जिल्हा / जालना जिल्हा / बीड जिल्हासाठी **शोध व बचाव कार्य पथकाला** आपत्कालीन सेवा देणे बंधणकारक आहे.

२. **प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र** स्थापन करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद यांच्याकडुन मौजे करोडी ता.जि. औरंगाबाद येथे गट नंबर २४ मधील ७ एकर २६ गुठे जमीन अग्निाशमन दलास ताब्यात मिळालेली आहे. त्याठिकाणी सुसज्ज असे प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन करुन **संकट समयी अग्निशमन दलास सेवा देणे क्रमप्राप्त आहे**.

३. महाराष्ट्र शासनाच्या धोरणात्मक निर्णय दिनांक २५/०७/२००६ नुसार **शोध व बचाव कार्य प्रमुखछ** म्हणून मुख्य अग्निशमन अधिकारी व इतर अग्निशमन अधिकारी यांना निर्देशीत केलेले आहे.

४. सन २००६ मध्ये औरंगाबाद व औरंगाबाद जिल्ह्यात पावसाळयात **शोध व बचाव कार्य पथकाने उत्कृष्टपणे** सेवा पुरविली होती. जसे कावसान (जुने) पैठण येथून २३ नागरिकांना पैठण नदीच्या सर्वात मोठ्या पुरातून सुखरुप बाहेर काढण्याचे काम शोध व बचाव कार्य पथकाने केलेले आहे.

५. **औरंगाबाद/ बीड / जालना** जिल्ह्यातून गोदावरी नदी वाहत आहे त्यामुळे वेळोवेळी शोध व बचाव कार्य पथकाला या तीनही जिल्ह्यामध्ये जीवत व वित्तहानी वाचवण्यासाठी आपत्कालीन व्यवस्थापन कायदा २००५ नुसार कार्य करणे बंधनकारक आहे.

६. दिनांक ३०/०६/२०११ रोजी **सिल्लोड तालुक्यातील बनकिन्होळा गावांजवळ एस.टी. महामंडळाच्या बसला (एम.एच-२० डी ८१५९) अपघात झाला व बस ३०० फुट अंतरावर असलेल्या विहीरीत जाऊन पडली.** याठिकाणी अग्निशमन दलाने त्वरीत एक अग्निशमन वाहन व एक रुग्णवाहिकासह ०३ अधिकारी व ०६ कर्मचारी यांना मदतीसाठी पाठवुन ५ जखमी झालेल्या व्यक्तीना व १८ मृत व्यक्तीना विहीरीबाहेर काढले व जखमीना त्वरीत दवाखान्यात दाखल करण्यात आले.

७. **शहर आपत्ती व्यवस्थापन समिती** स्थापन केली आहे. त्याचे मा. आयुक्त अध्यक्ष व नोडल ऑफीसर म्हणून मुख्य अग्निशमन अधिकारी यांना नामनिर्देशीत केले आहे. तसेच **जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती** मध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी यांना प्रमुख शोध व बचाव कार्य पथक-१ मध्ये नामनिर्देशीत केलेले आहे.

८. अग्निशमन विभाग हा औरंगाबाद शहर व मराठवाडा विभागातील ८ जिल्ह्यातील कोणतीही आपत्कालीन परीथिती हाताळण्यासाठी २४ तास सज्ज असणार आहे. आपत्कालीन परीस्थिती (Disaster Management ) ज्यामध्ये **भुकंप/ चक्रीवादळ /महापूर / रोड अपघात / मोठया आगी/एल.पी.जी. लीकेज/ रस्त्यावरील केमीकल अपघात/ आतंकवाद्यांनी/ अतिरेक्यांनी घडवून आणलेले स्फोट/ दंगली** इत्यादी साठी कमीतकमी वेळेत जाऊन संभाव्य जिवीत व वित्तहानी वाचवण्याची कार्यवाही करावी

लागणार आहे. अलीकडील काळात औरंगाबाद शहर व काही जिल्हे हे अतिसंवेदनशील म्हणून ओळखले जात आहेत.

९. शासन निर्णय अधिनियम क्र. अशस.१४०८/१४९१/प्र.क्र.२२१/०८/नवि-२०, नगर विकास विभाग, मंत्रायल, मुंबई-३२, दि. ०६/१२/२००८ नुसार संपुर्ण राज्यामध्ये महाराष्ट्र शासनाने ६ डिसेंबर २००८ मध्ये सर्व निवासी व उद्योग /व्यवसाय यासाठी आगीच्या दुर्घटनेमध्ये जनतेची होणारी संभाव्य जिवीत व वित्तहानी कमी करण्यासाठी **महाराष्ट्र आग प्रतिबधंक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६** (Maharashtra Fire Prevention and Life Safety Measures Act २००६) लागू करण्यात आलेला आहे.

१०. **अ)** महानगरपालिका अग्निशमन विभागाने एप्रिल २००१ ते ऑक्टोंबर २०११ या काळात खालील प्रमाणे कार्य केले आहे.

| **एकुण कॉल** | फायर कॉल | रेस्क्यू कॉल | इतर कॉल | खोटे कॉल | आगीमुळे नुकसान | आगीतून वाचवलेली मालमत्ता | मृत | जखमी | वाचवले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **६४७७** | २६७२ | १५८९ | २१७१ | ४५ | २३६,२२,३९,९३३/- | ८२५,१२,९३,६५८/- | ४५५ | २९८ | २४५ |

## ब) अग्निशमन विभागातर्फे खालील प्रमाणे वसुली करण्यात आली.

| **सन** | **एन.ओ.सी चार्जेस** | **एन.ओ.सी नुतनीकरण चार्जेस** | **एन.ओ.सी विलंब चार्जेस** | **कॅपीटेशन फीस** | **फायर कॉल चार्जेस** | **रेस्क्यू कॉल चार्जेस** | **पंपींग कॉल चार्जेस** | **फायर सर्टीफीकेट चार्जेस** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| **२०००-०१** | **६३५००** | **५२५००** | **१०२३१८** | **५४२६६८** | **६६२२९** | **०** | **१२६७१** | **१३६००** |
| **२००१-०२** | **३३९०००** | **८१६५०** | **१०५२५०** | **१२२१६८४** | **११८८९७** | **२३३२** | **२७३६** | **१६०००** |
| **२००२-०३** | **३८०५००** | **१०६०००** | **६००००** | **१२७९९१८** | **३०१८०१** | **२१३५** | **२७७६** | **२४०००** |
| **२००३-०४** | **१९९०००** | **८९०००** | **३१२५०** | **८५१५४१** | **२८६५८६** | **१७९३८** | **२४८७** | **२२०००** |
| **२००४-०५** | **२३१०००** | **८९०००** | **९०००** | **८४३४९२** | **३०८१९३** | **१४४९८** | **३९३०** | **१८०००** |
| **२००५-०६** | **१८७०००** | **२१४०००** | **३४०००** | **८३८०००** | **४४०२२२** | **१६३९** | **२७८४३** | **१६०००** |
| **२००६-०७** | **२३८५००** | **१५५५००** | **११२५५०** | **९०४०४५** | **२७३१४९** | **४८९४२** | **१४६१०** | **२४०००** |
| **२००७-०८** | **३९२०००** | **८३२०००** | **५०९१५०** | **२२४७८२२** | **३१२६५७** | **१३१३०** | **०** | **२८०००** |
| **२००८-०९** | **३७८५००** | **५१६५००** | **५२४१५०** | **२११३८३** | **३१४३५४** | **३०६५३** | **२५२४** | **२४०००** |
| **२००९-१०** | **३२२०००** | **५६५०००** | **२३४४५०** | **२३४४८५८** | **१६६२८४८** | **४४६७३** | **११६८४** | **१९०००** |
| **२०१०-११** | **६९२०००** | **७१२५००** | **२७८८००** | **२९९३१५३** | **२६३५६४** | **२५९०६** | **१६५९१** | **२००००** |
| एप्रिल-डिसेंबर **२०११** | **६०५०००** | **५१५०००** | **२८८५००** | **२१२५७९९** | **८६७३६४** | **४६८३८** | **१६९३४** | **१५०००** |
| एकुण | ४०२८००० | ३९२८६५० | २२८९४१८ | १८३०४३६३ | ५२१५८६४ | २४८६८४ | ११४७८६ | २३९६०० |

## क) औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद अग्निशमन दलाचे एकुण वसुली व एकुण खर्च

| सन | अग्निशमन कराची प्रत्यक्ष वसुली | अग्निशमन दलाची एकुण वसुली | एकुण (A+B) | अग्निशमन विभागातील कर्मचारीचा आस्थापना खर्च | अग्निशमन विभागातील साहित्य खरेदी | एकुण (C+D) | फरक (E--F) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | A | B | E | C | D | F | |
| २०००-०१ | १८,६७,००० | २०,२४,५८३ | ३८,९१,५८३ | ४९,८०,५४३ | ३,९५,२७७ | ५३,७५,८२० | -१४,८४,२३७ |
| २०००-०२ | २६,३७,००० | ४०,४३,६४३ | ६६,८०,६४३ | ४८,९१,२२१ | १८,६०,२९५ | ६७,५१,५१६ | -७०,८७३ |
| २००२-०३ | २८,५२,००० | ३३,२६,४९४ | ६१,७८,४९४ | ४३,१४,३९८ | ४,३८,५६९ | ४७,५२,९६७ | १४,२५,५२७ |
| २००३-०४ | २८,८८,००० | १८,७७,८९१ | ४७,६५,८९१ | ७२,५५,००५ | ४,६८,२७१ | ७७,२३,२७६ | -२९,५७,३८५ |
| २००४-०५ | २८,३७,००० | २५,०३,१४० | ५३,४०,१४० | ६२,०३,१८३ | १७,२३,००९ | ७९,२६,१९२ | -२५,८६,०५२ |
| २००५-०६ | ५३,६८,००० | २०,००,१९२ | ७३,६८,१९२ | ७४,८६,३०५ | ५,६०० | ७४,९१,९०५ | -१,२३,७१३ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २००६-०७ | ६९,९३,००० | १९,४३,७३१ | ८९,३६,७३१ | ८४,६४,९२० | ३६,२८,८८७ | १,२०,९३,८०७ | -३१,५७,०७६ |
| २००७-०८ | ९३,५४,००० | ५१,९३,६५४ | १,४५,४७,६५४ | ९१,९३,५७८ | ६२,३२,६१८ | १,५४,२६,१९६ | -८,७८,५४२ |
| २००८-०९ | १,२४,९८,००० | ४२,२४,१५९ | १,६७,२२,१५९ | १,३५,८६,४५० | ६१,१२,५२१ | १,९६,९८,९७१ | -२९,७६,८१२ |
| २००९-१० | १,१४,९८,००० | ५६,८६,५०२ | १,७१,८४,५०२ | १,३३,९६,१६४ | १२,८५,१२४ | १,४६,८१,२८८ | **२५,०३,२१४** |
| २०१०-११ | २,३०,००,००० | ६१,३८,५६९ | २,९१,३८,५६९ | १,४६,१३,०७२ | १,०८,८९,२६८ | २,५५,०२,३४० | **३६,३६,२२९** |
| **एकुण** | **८,१७,९२,०००** | **३,८९,६२,५५८** | **१२,०७,५४,५५८** | **९,४३,८४,८३९** | **३,३०,३९,४३९** | **१२,७४,२४,२७८** | -६६,६९,७२० |
| एप्रिल-डिसेंबर २०११ | | **६०,५५,३८८/-** | | **८८,३८,९५८/-** | | | |

११. आपत्ती समयी **औरंगाबाद / जालना / बीड व मराठवाडयातील इतर** जिल्हामध्ये संकटसमयी मदत पोहचवितांना जसे रेस्क्यु साहित्य/बोटी/ अधिकारी व कर्मचारी व इतर मदत पोहचविणे अत्यंत जरुरीचे असते व ती वेळेत पोहचल्यास कमीत कमी **जिवीत व वीत्तहानी होण्यास मदत होते व लोकांची संकटातुन सुटका करणे शक्य होऊ शकते. शोध व बचाव कार्यासाठी अग्निशमन दलास स्कारपिओ (Scorpio VLX ७५ TR Air Bag, BS III) हे वाहन खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे.**

१२. अग्निशमन विभाग **मुंबई / ठाणे / पुणे / पिंपरी चिंचवड / नाशिक** या ठिकाणी आपत्ती समयी काम करण्यास अशा प्रकारच्या सुसज्ज लहान वाहनाची उपलब्धता करुन देण्यात आलेली आहे.

१३. रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद यांच्या कोटेशननूसार महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे **स्कारपिओ (Scorpio VLX ७५ TR Air Bag, BS III)** या वाहनासाठी रुपये १२,३६,२५३ /- (अक्षरी बारा लाख छत्तीस हजार दोनशे त्रेपन्न रुपये) खर्च येणार आहे.

| **Model No** | **Scorpio VLX ७५ TR Air Bag, BS III** |
|---|---|
| Showroom Price | Rs. १०,२८,०००/- |
| Insurance Charges | Rs. ३९,६२३/- |
| R.T.O. Registration Charges & Road Tax | Rs. १,४८,०७०/- |
| LBT (२ %) | Rs. २०,५६०/- |
| **Total** | **Rs. १२,३६,२५३/-** |

वर नमूद तपशिलानुसार रत्नप्रभा मोटर्स, औरंगाबाद यांच्याकडुन (Scorpio VLX ७५ TR Air Bag, BS III) वाहन खरेदी व लागणाऱ्या खर्चाचा प्रस्ताव (BPMC Act १९४९ चे कलम ७६ व ७७ नुसार शिफारशीसह मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :-</u>**

श्री.मुजीब खॉन :प्रस्ताव मोठा आहे हे खरेदी करण्याची गरज आहे का कोणती एजन्सी आहे.

श्री.गजानन बारवाल :अग्निशमन विभागाने केलेली कार्यवाही अतिशय चांगल्या प्रकारे आहे मंजूर करावे.

मुख्य अग्निशमन अधि. :अधिकारी जेंव्हा साईटवर जातात तेंव्हा तेथे अम्बुलन्स जात नाही हे वाहन वेळात जाते डिझेल वाहन आहे.तीन जिल्हयातील काम करावे लागते.

मा.महापौर :प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन विभागासाठी प्रस्तावातील क्र. १ ते १२ नुसार अग्निशमन व आणीबाणी सेवेत काम करण्यास सुसज्ज असे लहान वाहनाची आवश्यकता असल्याने प्रस्तावात नमुद केल्या प्रमाणे रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद यांच्या कोटेशननूसार महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे **स्कारपिओ (Scorpio VLX ७५ TR Air Bag, BS III)** या वाहन खरेदीसाठी रुपये १२,३६,२५३ /- (अक्षरी बारा लाख छत्तीस हजार दोनशे त्रेपन्न रुपये) खर्चास मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. :- ५९२**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद महानगरपालिकेच्या सिध्दार्थ जलतरण तलावाच्या आकारले जाणारे सभासद शुल्क हे सन २००१ पासुन म्हणजेच गेल्या १० वर्षापासुन कोणतेही दरवाढ न करता आकारण्यात येत आहेत.

परंतु आस्थापने वरील खर्च तसेच सिध्दार्थ जलतरण तलावाच्या देखभाल खर्च, रंगरंगोटी व रसायनीक खर्च,इत्यादी मुळे मिळणारे उत्पन्न व होणारा खर्च या मध्ये तफावत दिसुन येत आहे. करीता येणाऱ्या उन्हाळी सत्रामध्ये (१ फेब्रुवारी २०१२) पासुन सभासद शुल्क दरवाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे वार्षिक उत्पन्नात वाढ होवुन देखभाल व आस्थापनेवरील खर्चाची वसुली करता येईल.

सद्यास्थितीत सिध्दार्थ जलतरण तलावावर मासिक,तीन मासिक,वार्षिक असे विविध प्रकारचे सभासद आहेत. व त्यांचे वर्तमान सभासद शुल्क व प्रस्तावित सभासद शुल्क खालील प्रमाणे आहे.

**तक्ता पुरुष व माहिलासाठी**

| अ.क्र. | कालावधी | वर्तमान दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| ०१. | मासिक | ५००/- | ७००/- |
| ०२. | त्रिमासिक | १२००/- | १८००/- |
| ०३. | वार्षिक | २५००/- | ४०००/- |
| ०४. | अजिव | २०,०००/- अजिवन | ३०,०००/- मर्यादित २० वर्ष |

**तक्ता कौटुंबिक**

**आई ,वडील व दोन मुलांकरीता मर्यादीत**

| अ.क्र. | कालावधी | वर्तमान दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| ०१. | मासिक | १०००/- | १५००/- |
| ०२. | त्रिमासिक | २५००/- | ४०००/- |
| ०३. | वार्षिक | ७५००/- | १०,०००/- |

**तक्ता १२ वर्षाखालील**

| अ.क्र. | कालावधी | वर्तमान दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| ०१. | मासिक | २५०/- | ४००/- |
| ०२. | त्रिमासिक | ८००/- | १०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३. | वार्षिक | १२००/- | २०००/- |
| ०४. | अजिव | २०,०००/-<br>अजिवन | ३०,०००/-<br>मर्यादित २० वर्ष |

**<u>इतर शुल्क</u>**

| अ.क्र. | विवरण | वर्तमान दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| ०१. | ओखळ पत्र | १०/- | २५/- |
| ०२. | चाचणी | १०/- | २०/- |
| ०३. | प्रवेश फॉर्म | ५/- | ५/- |
| ०४. | प्रशिक्षण | २००/- | ३००/- |

**<u>नविन मुद्यांचे दर</u>**

| अ.क्र. | मुद्ये | वर्तमान दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| ०१. | दंड | -- | ५०/- |
| ०२. | १ तासाकरीता | -- | ५०/- |
| ०३. | शास्त्रयोक्त प्रशिक्षण | -- | ५००/- |

सद्या आकारण्यात येत असलेल्या सभासद शुल्कातुन सन २०१०-२०११ साली ३६ लक्ष उत्पन्न प्राप्त झाले असुन नविन प्रस्तावित दरामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होवुन अंदाजे वार्षिक उत्पन्न ५० लक्ष मिळण्याचे अपेक्षीत आहे.

सद्यास्थिती मध्ये महानगरपालिकेची असलेली आर्थिक परिस्थिती पहाता तसेच सन २००१ पासुन सिध्दार्थ जलतरण तलावा अंतर्गत कोणतीही दरवाढ केली नसल्याने माहे १ फेब्रुवारी २०१२ पासुन सिध्दार्थ जलतरणीकेवर सभासद शुल्क वाढ करण्यासाठी प्रस्तावित करण्यांत येत आहे.

करीता वरील प्रस्तावित तक्त्यानुसार सिध्दार्थ जलतरणीकेवर सभासद शुल्क दरवाढी बाबतचा धोरणात्मक प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :-</u>**

श्री.गिरजाराम हाळनोर: दहा वर्षात दरवाढ केली नव्हती. दरवाढ करणे आवश्यक आहे. जे अपंग सदस्य येथे येणार तसेच राष्ट्रीय व राज्यपातळीवरील खेळाडू यांना येथील शुल्कामध्ये सवलत द्यावी. येथील जे उत्पन्न येईल ते जलतरण तलावासाठी खर्च करण्यात यावे.

श्री.राजु शिंदे :सिध्दार्थ उद्यान विकासाठी बजेटमध्ये वेगळी तरतुद नाही. उद्यानातील जे उत्पन्न येईल ते तेथे व इतर उद्यानासाठी खर्च करावे. व येणाऱ्या बजेटमध्ये तशी तरतुद करावी. येणारे उत्पन्न तेथे खर्च करण्यासाठी उद्यान अधिक्षक यांना अधिकार दिले जावे.

श्री.गजानन बारवाल: राष्ट्रीय तसेच राज्यस्तवरी व अपंग खेळाडूंना ५० टक्के सवलत यामध्ये देण्यात यावी.

मा.महापौर :राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय व अपंग खेळाडूंना यामध्ये प्रस्तावित सवलत देण्यात यावी. विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ जलतरण तलावावर मासिक, तीन मासिक,वार्षिक असे विविध प्रकारचे सभासद आहेत व त्यांचे वर्तमान सभासद शुल्क व प्रस्तावित सभासद शुल्क प्रस्तावात नमुद तक्त्यानुसार माहे १ फेब्रुवारी २०१२ पासुन सिध्दार्थ जलतरणीकेवर सभासद शुल्क वाढ करण्यास मंजूरी देण्यात येते तसेच राष्ट्रीय,राज्यस्तरीय व अपंग खेळाडूंना जलतरणीकेवर सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे ५०% सवलत देण्यासह मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय क्र. :- ५९३**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७० विद्यानगर अंतर्गत छत्रपतीनगर येथे महानगरपालिकाची खुली जागा आहे त्या जागेवर सांस्कृतीक कार्यक्रम घेण्यासाठी व मुलांसाठी तसेच महीला व इतर विविध उपक्रम राबविण्यासाठी महानगरपालिकाची खुली जागा आहे.

सेवाभावी व बाल संस्कार केंद्र चालविण्यासाठी भाडेतत्वावर कायमस्वरूपीसाठी मंजुरी देण्यात यावी.

सुचक :- सौ.कला रविनंदन ओझा अनुमोदक :-श्री.शेरखाने दिग्विजय

श्री.मुजीब खॉन :यापूर्वीही असा ठराव आला होता नामंजूर केला होता पुन्हा बदल करून येतात हे योग्य नाही खुलासा घ्यावा.

श्री.गजानन बारवाल :एखादी चांगली सेवा भावी संस्था आहे त्यांना देण्याचा आपल्याला अधिकार आहे. कशा प्रकारे दयायचे या बाबत योग्य निर्णय घ्यावा.

श्री.गिरजाराम हळनोर :नियमानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी नियमानुसार जेवढी जास्त रक्कमेवर देता येत असेल त्याप्रमाणे दयावे

श्री.काशिनाथ कोकाटे :ही महापालिकेच्या लेआऊटमधील खुली जागा आहे ती भाडयाने देवू शकतो का खुलासा घ्यावा.

मा.महापौर : शहरातील व इतर भागातील हॉल भाडयाने देताना १००० रू प्रमाणे तसेच मोकळयाजागेसाठी १००० रू. प्रति महा भाडे आकारण्यात यावे या धोरणानुसार सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहातील चर्चेनुसार प्रभाग क्र.७० विद्यानगर अंतर्गत छत्रपतीनगर येथे महानगरपालिकाची खुली जागा सेवाभावी व बाल संस्कार केंद्र चालविण्यासाठी रू. १००० प्रति महा या प्रमाणे भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यास येते. वैधनिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर बॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने मुला/मुलींचे राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेकरीता महाराष्ट्र राज्यातून ६०० खेळाडू अंदाजे सहभागी होणार आहे. या स्पर्धेकरीता अंदाजे खर्च रूपये तीन लक्ष अपेक्षित आहे. या स्पर्धेला महानगरपालिके तर्फे आर्थिक मदत देवुन ही स्पर्धा राज्यस्तरीय महापौर चषक क्रीडा स्पर्धा या नावाने आयोजीत करण्यात यावे.

करीता औरंगाबाद शहर बॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने आयोजीत स्पर्धेस रूपये ३ लक्ष रक्कमेची आर्थिक मदत देवुन राज्यस्तरीय महापौर चषक क्रीडा स्पर्धा या नांवाने घेण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी सादर.

सुचक :-श्री.पंकज रामचंद्र भारसाखळे

अनुमोदक :- श्री.संजय किसनराव केनेकर, श्री.प्रशांत देसरडा, श्री.संजय जोशी,
श्री.बाळासाहेब दिनकर मुंडे, श्रीमती साधना सुरडकर, श्री.बबन नरवडे

**संवाद :**

श्री.प्रमोद राठोड :हे ठेवण्या मागे भुमिका काय विकास कामासाठी खाऊचे पैसे मागतो आहे खुलासा घ्यावा.

श्री.मुजीब खान :या मागची भुमिका काय खुलासा व्हावा. एकीकडे आपण आर्थीक मदतीची मागणी करतो व दुसरीकडे ३ लक्ष रक्कम देण्याचा प्रस्ताव येतो हे योग्य नाही.अशी मदत करणेसाठी महापालिकेची आर्थीक परीस्थिती नाही हा प्रस्ताव नामंजूर करावा.

श्री.राजू शिंदे :महापालिकेची आर्थीक परीस्थिती घेणेसारखी आहे देणेसारखी नाही देणे सारखी परीस्थिती असेल तरी असे विषय यापूढे येवू नये.

श्री.गिरजाराम हळनोर :खेळा साठी नेहमीच मदत करतो किमान ५० हजार देण्यात यावे.

श्री.मीर हिदायत अली :विकास कामासाठी कर्मचा-यांचे पगाराची मागणी होते आहे. अशी मदत देणे योग्य नाही नामंजूर करावे.

डॉ.जफर खॉन :आर्थीक परीस्थिती बरोबर नाही नामंजूर करावे.

मा.उपमहापौर :यानंतर असे एकही ठराव येणार नाही असे प्रशासन व सभागृहाचे मत झाले असेल तर हा प्रस्ताव नामंजूर करण्यास हरकत नाही.

मा.महापौर :प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव नामंजुर करण्यास मंजुरी देण्यात आली.

**<u>विषय क्र. ५९५</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६१ समर्थनगर करीता अर्थसंकल्पात ठेवण्यांत आलेल्या तरतुदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | जूने लेखाशिर्ष | सुधारीत कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१. | विकास योजनेतंर्गत भुखंड संरक्षण वॉर्ड क्र.६१ समर्थनगरसाठी वार्ड-ड, न्यु वर्क पान क्र.३५, अ.क्र.४ वर उपलब्ध तरतुद र.रूपये १०.०० लक्ष | वार्ड क्र.६१ समर्थनगरमध्ये विविध ठिकाणी पुनडांबरीकरण करणे. र.रूपये १०.०० लक्ष. |

सुचक :-श्री.समीर सुभाष राजुरकर अनुमोदक :-श्री.अफसर खान यासीन खान

श्री.मुजीब खान :सर्व विषय मंजूर करावे.

मा.महापौर :मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.६१ समर्थनगर करीता अर्थसंकल्पात ठेवण्यांत आलेल्या तरतुदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जूने लेखाशिर्ष | सुधारीत कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१. | विकास योजनेतंर्गत भुखंड संरक्षण वॉर्ड क्र.६१ समर्थनगरसाठी वार्ड-ड, न्यु वर्क पान क्र.३५, अ.क्र.४ वर उपलब्ध तरतुद र.रूपये १०.०० लक्ष | वार्ड क्र.६१ समर्थनगरमध्ये विविध ठिकाणी पुनडांबरीकरण करणे. र.रूपये १०.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९६**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वार्ड क्र.८० अंबिकानगर संतोषीमातानगर येथील पुलाची उंची वाढविणे या कामासाठी अर्थसंकल्पात पान क्र.जीबीआर-ई-४ अ.क्र. १ वर २० लक्ष तरतुद ठेवण्यात आली होती परंतु दिनांक १८.०५.२०११ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्रमांक ३४० अन्वये प्रभागातील अंबिकानगर गल्ली नं.१ ते ६ मारोतीच्या मंदिरा पर्यंत नाला चॅनलिंग करणे या सुधारीत काम करण्याचा प्रस्तावास मान्यता प्राप्त झालेली आहे.

तथापी सदरील कामाऐवजी नविन खालील सुधारीत विकास कामे करण्यास मान्यता देवुन सदरील काम हाती घेण्याबाबतच्या प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

नविन सुधारीत काम

१. वार्ड क्र.८० महालक्ष्मी चौक ते श्री.मुंडे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. १० लक्ष

२. वार्ड क्र.८० मध्ये विविध ठिकाणी रस्ते देखभाल व दुरूस्ती करणे. १० लक्ष

सुचक:सौ.कमलताई रामचंद्र नरोटे अनुमोदक:श्री.नारायण कुचे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.८० अंबिकानगर संतोषीमातानगर येथील पुलाची उंची वाढविणे या कामासाठी अर्थसंकल्पात पान क्र.जीबीआर-ई-४ अ.क्र. १ वर २० लक्ष तरतुद खालील नविन सुधारीत कामासाठी खर्च करण्यास मंजूरी देण्यात येते

नविन सुधारीत काम

१. वार्ड क्र.८० महालक्ष्मी चौक ते श्री.मुंडे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. १० लक्ष

२. वार्ड क्र.८० मध्ये विविध ठिकाणी रस्ते देखभाल व दुरूस्ती करणे. १० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९७**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक ६२ अंतर्गत भाग्यनगर येथील खुली जागा विकसीत करणेच्या कामासाठी सन २०११-१२च्या अर्थसंकल्पात रक्कम रूपये ५.०० लक्षची तरतुद पान क्रमांक २२ अनुक्रमांक ०२ स्पिल वर ठेवण्यात आलेली आहे. सदर कामाची सद्यस्थितीत आवश्यकता नसल्याने नमुद कामाची तरतुद प्रभाग क्र.६२ अंतर्गत विविध भागात ड्रेनेज लाईन टाकण्योच्या कामासाठी लेखाशिर्ष वळती करणेच्या कामाच्या प्रस्तावास आगामी सर्वसाधारण सभेची मान्यता देऊन सदरील काम तातडीने हाती घेणे बाबत संबंधीत विभागास आपल्या स्तरावर सुचीत करावे ही विनंती.

सुचक:श्री.बबन पं.नरवडे अनुमोदक: श्री.संजय केनेकर, श्री.पंकज भारसाखळे, श्रीमती साधना सुरडकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्रमांक ६२ अंतर्गत भाग्यनगर येथील खुली जागा विकसीत करणेच्या कामासाठी सन २०११-१२च्या अर्थसंकल्पात रूपये ५.०० लक्षची ठेवलेली तरतुद प्रभाग क्र.६२ अंतर्गत विविध भागात ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी लेखाशिर्ष वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय</u> <u>क्र.:- ५९८</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्रमांक ९६ हमालवाडा अंतर्गत येणाऱ्या पैठण रोड, बीड बायपास, रेल्वे ब्रिज हे रस्ते ज्या चौकात मिळतात त्या चौकास कोहिनूर चौक असे नामकरण करण्यात यावे अशी मागणी बऱ्याच वर्षापासून नागरीकांकडून होत असुन सदरील चौकास कोहिनूर चौक असे नामकरण करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

सुचक:श्री.शेख ख्वाजा शरीफोद्दीन मुल्ला. श्री.गजानन बारवाल, श्री.रावसाहेब गायकवाड

**संवाद :**

श्री.गिरजाराम हाळनोर :या चौकास ऑलरेडी चक्रधर स्वामी नाव देण्यात आलेले आहे रद्द करावे.

मा.महापौर :विषय नामंजूर करण्यात येतो.

**ठराव** :

प्रस्तुत चौकास यापूर्वीच नाव देण्यात आलेले असल्याने हा प्रस्ताव नामंजुर करण्यात येतो.

**विषय क्र.:- ५९९**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र. ७ करीता अर्थसंकल्प सन २०११-१२ मध्ये असलेल्या कामाचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे. करीता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०११-१२ पा.क्र. व अ.क्र. | जुन्या कामाचे लेखाशिर्ष | नविन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| ०१. | <u>मेन सिव्हर लाईन</u><br>जी.बी.आर. वार्ड-अ पा.क्र.३ अ.क्र.१ | वार्ड क्र. ७ भावसिंगपुरा येथे मेन सिव्हर लाईन टाकणे<br>र.रु. २०.०० लक्ष. | ०१. वार्ड क्र. ०७ भिमनगर भावसिंगपुरा अंतर्गत विविध ठिकाणी डांबरीकरण करणे.<br>र.रु. १५.०० लक्ष.<br>०२. वार्ड क्र. ०७ मध्ये खुले व्यासपीठ जसे, ओटा व शेड बांधणे.<br>र.रु. ३.५० लक्ष.<br>०३. वार्ड क्र. ०७ मध्ये विविध ठिकाणी पोलसह ऊर्जा बचत दिवे लावणे. र.रु. १.५० लक्ष. |

सुचक : श्री कृष्णा एस. बनकर अनुमोदक : श्री राजु रामराव शिंदे

**संवाद :**

श्री.गिरजाराम हळनोर :प्रस्तावात २० लक्षची दर्शविलेली तरतुद पुर्ण प्रभाग समितीच्या वार्डासाठी असेल तर समान तरतुद देण्यात यावी.नमुद केल्याप्रमाणे एकाच वार्डासाठी असेल तर मंजूर करावे.

श्री.कृष्णा बनकर :फक्त वार्ड क्र ७ साठी ही तरतूद आहे.

मा.महापौर :मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र. ७ करीता अर्थसंकल्प सन २०११-१२ मध्ये असलेल्या कामाचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०११-१२ पा.क्र. व अ.क्र. | जुन्या कामाचे लेखाशिर्ष | नविन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| ०१. | <u>मेन सिव्हर लाईन</u><br>जी.बी.आर. वार्ड-अ पा.क्र.३ अ.क्र.१ | वार्ड क्र. ७ भावसिंगपुरा येथे मेन सिव्हर लाईन टाकणे<br>र.रु. २०.०० लक्ष. | ०१. वार्ड क्र. ०७ भिमनगर भावसिंगपुरा अंतर्गत विविध ठिकाणी डांबरीकरण करणे.<br>र.रु. १५.०० लक्ष.<br>०२. वार्ड क्र. ०७ मध्ये खुले व्यासपीठ जसे, ओटा व शेड बांधणे.<br>र.रु. ३.५० लक्ष.<br>०३. वार्ड क्र. ०७ मध्ये विविध ठिकाणी पोलसह ऊर्जा बचत दिवे लावणे. र.रु. १.५० लक्ष. |

वैधनिक कार्यवाही व्हावी .

**विषय क्र.:- ६००**

प्रस्ताव दाखल करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेने टी.डी.आर ची योजना सुरु करण्यात आलेली सदर योजनेचे नियम हे सर्व महानगरपालिका क्षेत्रामध्ये लागू होत असतांना त्यामध्ये सिडको भागाचा समावेश झालेला नाही. तो करण्यात यावा करीता प्रस्ताव ठेवत आहे.

सुचक : श्री काशीनाथ हरिभाऊ कोकाटे अनुमोदक : श्री प्रमोद राठोड, श्री मीर हिदायत अली

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेने टी.डी.आर ची योजना महानगरपालिका क्षेत्रामध्ये लागू होत असतांना त्यात सिडको भागाचा समावेश करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. :- ६०१</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की औरंगाबाद जिल्हयातील श्रीक्षेत्र वेरुळ हे १२ ज्योर्तिलिंगापैकी १२ वे स्थान आहे. येथे दरवर्षी महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. सदरील यात्रेसाठी संपूर्ण महाराष्ट्रातून व औरंगाबाद शहरातून फार मोठया प्रमाणात नागरिक जात असतात.

याबाबींचा विचार करुन श्रीक्षेत्र वेरुळ, घृष्णेश्वर देवस्थान येथे सुरक्षिततेचा उपाय म्हणून “महाशिवरात्री” च्या दिवशी दि. १९.०२.२०१२ च्या मध्यरात्री पासून ते दि. २०.०२.२०१२ च्या मध्यरात्री पर्यंत औरंगाबाद महानगरपालिके मार्फत अग्निशामक दलाची गाडी दरवर्षी प्रमाणे उपलब्ध करुन देण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री अनिल जैस्वाल अनुमोदक : श्री अशोक किसनराव बेहडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद जिल्हयातील श्रीक्षेत्र वेरुळ, घृष्णेश्वर देवस्थान येथे सुरक्षिततेचा उपाय म्हणून "महाशिवरात्री" च्या दिवशी दि. १९.०२.२०१२ च्या मध्यरात्री पासून ते दि. २०.०२.२०१२ च्या मध्यरात्री पर्यंत औरंगाबाद महानगरपालिके मार्फत अग्निशामक दलाची गाडी दरवर्षी प्रमाणे उपलब्ध करुन देण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र:- ६०२**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. १७ श्रीकृष्णनगर मधील २०११-१२ अर्थ संकल्पात ठेवण्यात आलेल्या तरतुदीचे खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलणे करीता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अर्थ संकल्पातील तरतूद | सुधारीत कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|
| १) विकास योजनेतंर्गत भूखंड संरक्षण अ.क्र. २ वॉर्ड क्र. १७ मधील खुली जागा विकसीत करणे (रुपये ५ लक्ष)<br>वॉर्ड ब - जीबीआर पान क्रमांक ४<br>२) भांडवली काम जलनि:सारण (शहर) अ.क्र. ३ वॉर्ड क्र. १७ विविध ठिकाणी मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे (रक्कम रुपये ३ लक्ष)<br>वॉर्ड ब जीबीआर पान क्रमांक ५<br>३) पा.क्र. जीबीआर वार्ड -ब पान २ अ.क्र.१३- वार्ड क्र. १७ एन-९, आर २७ प्रतापनगर येथील अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे (रक्कम रुपये १० लक्ष) | एन-९ भारतमाता हौ. सोसायटी शेजारील नाल्याची आर.सी.सी भिंत (रिटेनिंग वॉल) बांधणे करीता ( रक्कम रुपये १८ लक्ष) |

सुचक : श्री महेश माळवतकर अनुमोदक : श्री किशोर नागरे

**ठराव**

प्रस्ताव दर्शिविल्याप्रमाणे वार्ड क्र. १७ श्रीकृष्णनगर मधील २०११-१२ अर्थ संकल्पात ठेवण्यात आलेल्या तरतुदीचे खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अर्थ संकल्पातील तरतूद | सुधारीत कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|
| १) विकास योजनेतंर्गत भूखंड संरक्षण अ.क्र. २ वॉर्ड क्र. १७ मधील खुली जागा विकसीत करणे (रुपये ५ लक्ष)<br>वॉर्ड ब - जीबीआर पान क्रमांक ४<br>२) भांडवली काम जलनि:सारण (शहर) अ.क्र. ३ वॉर्ड क्र. १७ विविध ठिकाणी मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे (रक्कम रुपये ३ लक्ष)<br>वॉर्ड ब जीबीआर पान क्रमांक ५<br>३) पा.क्र. जीबीआर वार्ड -ब पान २ अ.क्र.१३- वार्ड क्र. १७ एन-९, आर २७ प्रतापनगर येथील अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे (रक्कम रुपये १० लक्ष) | एन-९ भारतमाता हौ. सोसायटी शेजारील नाल्याची आर.सी.सी भिंत (रिटेनिंग वॉल) बांधणे करीता ( रक्कम रुपये १८ लक्ष) |

वैधनिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०३**

प्रस्ताव दाखल करण्यात येतो की, उत्कर्ष अपंग प्रशिक्षण संस्था ही अपंगासाठी कार्य करणारी एक नामांकित संस्था आहे. विशेषत: मुक-बधीर मुलांना प्रशिक्षण देण्याचे महत्वपूर्ण काम करीत आहे. या संस्थेने कांचनवाडी येथील गट क्र ४७/३ डी मधील जागा संस्थेच्या कार्यालयासाठी देण्याबाबत विनंती केली आहे. संबंधित रेखांकन धारक सुध्दा या बाबी साठी तयार आहे. करीता या संस्थेची अपंगाच्या व मुक-बधीराच्या कार्यासाठीची नोंद घेऊन कांचनवाडी येथील गट क्र ४७/३ डी मधील जागा उत्कर्ष अपंग प्रशिक्षण संस्थेस देण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री रावसाहेब धोंडीराम गायकवाड अनुमोदक : श्री आनंद घोडेले

**संवाद:**

श्री.गिरजाराम हाळनोर : नियमात जी तरतुद आहे त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

मा.महापौर : नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उत्कर्ष कांचनवाडी येथील गट क्र ४७/३ डी मधील जागा उत्कर्ष अपंग प्रशिक्षण संस्थेस कार्यालयासाठी नियमानुसार देण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :-**

श्री.राजू शिंदे :महापालिकेने एमआयडीसी भागात प्रत्येंक कंपनीला सिव्हर टॅक्स म्हणून ३ लक्ष पर्यंतच्या नोटीसा दिल्या तेथे आपण रस्ते व लाईटची सुविधा देतो ड्रेनेज लाईनची नाही ती सेवा देत नाही पाणी देत नाही चुकीने लागलेला आहे.सेवा देत नाही तो टॅक्स वसुल करता येत नाही.रद्य करावे.

मा.महापौर :या बाबतीत प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**विषय क्र. ६०४** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पात वार्ड क्र. ४६ अल्तमश कॉलनी करीता खालील कामाची तरतुद ठेवण्यात आली आहे.हे काम समांतर जलवाहिनीचे अंदाजपत्रकामध्ये ठेवण्यात आले आहे. तरी या कामाचे लेखाशिर्षक बदलणे बाबत.

१. वार्ड क्र. ४६ येथे श्री.यासीन यांचे घरापासून जब्बारभाई मेवाती यांचे घरापर्यंत डी.आय.के जलवाहीनी टाकणे रूपये १० लक्ष (भांडवली कामे पाणीपुरवठा ) अ.क्र.२ पान क्र. जीबीआर वार्ड सी-४

<u>या कामा ऐवजी</u>

वार्ड क्र. ४६ मध्ये कॉक्रेटींग करणे / दुरूस्ती करणे, पेव्हर ब्लॉक बसविणे /दुरूस्ती करणे, ड्रेनेज लाईनटाकणे /दुरूस्ती करणे /विद्युतचे फुटकळ कामे करणे, कॅचपीट चेंबर बांधणे, खडी मुरूम टाकणे माती उचलणे इत्यादी आवश्यकतेनुसार फुटकळ कामे करणे एकुण १० लक्ष सदर प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक :श्री.मीर हिदायत अली अनुमोदक : श्री.मो.मुजीबीद्दीन मो.कदिरोद्दीन

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पात वार्ड क्र. ४६ अल्तमश कॉलनी येथे श्री.यासीन यांचे घरापासून जब्बारभाई मेवाती यांचे घरापर्यंत डी.आय.के जलवाहीनी टाकणे रूपये १० लक्ष (भांडवली कामे पाणीपुरवठा ) अ.क्र.२ पान क्र. जीबीआर वार्ड सी-४

<u>या कामा ऐवजी</u>

वार्ड क्र. ४६ मध्ये कॉक्रेटींग करणे / दुरूस्ती करणे, पेव्हर ब्लॉक बसविणे /दुरूस्ती करणे, ड्रेनेज लाईनटाकणे /दुरूस्ती करणे /विद्युतचे फुटकळ कामे करणे, कॅचपीट चेंबर बांधणे, खडी मुरूम टाकणे माती उचलणे इत्यादी आवश्यकतेनुसार १० लक्षची फुटकळ कामे करणेस मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी .

**<u>ऐनवेळेचे विषय</u>**

**<u>विषय क्र.:-६०५</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक आहे. यापूर्वी सन २००६-२००७ या आर्थिक वर्षापासून मालमत्ता कराच्या दरात कुठल्याही प्रकारची वाढ करण्यात आली नाही.

औरंगाबाद शहर हे औद्योगिकदृष्टया व ऐतिहासिकदृष्टया एक महत्वाचे शहर म्हणून सर्वश्रुत आहे. औरंगाबाद शहराचा संर्वागीण विकास होण्याच्या दृष्टीने या शहराचा समावेश हा जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण योजने अंतर्गत (JNNURM) व तत्सम योजने अंतर्गत करण्यासाठी प्राधान्याने कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून सद्यस्थितीत प्रचलित असलेल्या कर प्रणालीमध्ये काही अंशी बदल करणे गरजेचे आहे. त्यानुसार खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

सन २०११-२०१२ मध्ये कर आकारणी करणेसाठी पूर्वीप्रमाणेच खालील निवासी, निवासेत्तर, व्यावसायीक व औद्योगीक असे चार गट करण्यात आलेले आहे. ते पुढील प्रमाणे,

**०१.** **<u>निवासी</u>** :- राहते घर, माहिती तंत्रज्ञान वापरासाठी असलेल्या इमारती. (महाराष्ट्र शासनाचे औद्योगीक धोरण परिपत्रक क्र.शासन निर्णय आयटीपी-०३/सीआर-३९११/आयएनडी-७, दिनांक १२-७-२००३ अन्वये माहिती व माहिती तंत्रज्ञान यासाठी मिळकतींचा वापर असल्यास त्यांच्या करात सवलत देणेसाठी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, महाराष्ट्र शासन यांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.) धर्मादाय संस्था, स्वंयसेवी संस्था, सेवाभावी संस्था.

**०२.** **<u>निवासेत्तर</u>** :- वकीलाचे कार्यालये, डॉक्टरांचे क्लिनीक, कर सल्लागारांचे खाजगी कार्यालये, सर्व शाळा, सर्व महाविद्यालय तसेच सर्व शैक्षणिक संस्था व शैक्षणिक संस्थेशी संलग्न असलेली वस्तीगृहे, स्वतंत्र वस्तीगृहे.

**०३.** **<u>व्यावसायीक</u>** **:-०१.** पेट्रोलपंप व त्यास संलग्न असलेली खुली जागा, व्यावसायीक दराने खुल्या जागेचे दर वेगळे आकारले जाईल. हॉटेल्स, लॉन्स (लग्न, समारंभासाठी वापरात येणारे लॉन्स) व्यावसायीक वापरासाठी मोकळया जागा, मॉल्स, सर्व प्रकारची

दुकाने, खाजगी हॉस्पीटल्स्, कमर्शीयल पेड पार्कींगसाठी व्यावसायीक दराने कर आकारण्यात येईल. तसेच ज्या इमारती व्यावसायीक वापरासाठी भाड्याने दिल्या असतील अशा इमारतीनां सुध्दा व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल.

०४. **मोबाईल टॉवर्स** :- टॉवरसाठी भाडयाने घेतलेल्या इमारतीतील जागेचे प्रती माह भाडे नुसार किंवा भाडेपट्टा करारनामानुसार यापैकी जे जास्तीचे असेल त्याप्रमाणे कर आकारण्यात येईल. तसेच बी.एस.एन.एल. व इतर दूर संचार कंपनीचे स्वतःच्या जागेत मोबाईल टॉवर असल्यास अशा मोबाईल टॉवरला ऊंची व तळाचे क्षेत्रफळानुसार ठरविलेल्या दरानुसार कर आकारणी करण्यात येईल.

०५. **औद्योगीक** :- एम.आय.डी.सी., औद्योगीक क्षेत्र इत्यादी.

वरील संज्ञेत मोडत असलेल्या मालमत्तेस सामान्य कराचा दर खालील प्रमाणे राहील.

०६ **सामान्य करा बाबतचा तक्ता** :-

| सामान्य कराचा प्रकार वापराप्रमाणे | सध्याचे सामान्य कराचे दर | प्रस्तावित सामान्य कराचे दर |
|---|---|---|
| १. निवासी (उपरोक्त ‘अ’ प्रमाणे) | ३०% | ३०% |
| २. निवासेत्तर (उपरोक्त ‘ब’ प्रमाणे) | ३७.५% | ३७.५% |
| ३. व्यावसायीक (उपरोक्त ‘क’ प्रमाणे) | ४५% | ४५% |
| ४. औद्योगीक (उपरोक्त ‘ड’ प्रमाणे) | ३६% | ३६% |

०७. **नामांतर शुल्क** :-

७.१ खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त / कागदपत्र आधारे नामांतर शुल्क कर योग्य मुल्यावर खालील प्रमाणे आकारण्यात येतील.

| निवासी व व्यावसायीक कर योग्य मुल्य | नामांतर शुल्क | |
|---|---|---|
| | निवासी | व्यावसायीक |
| रू. ०१ ते १०,०००/- | रू.२०००/- | रू.४०००/- |
| रू. १०,००१/- ते ५०,०००/- | रू.४०००/- | रू.८०००/- |
| रू. ५०,००१/- ते पुढे | रू.६०००/- | रू.१२,०००/- |

०८. **विलंब शुल्क** :- औरंगाबाद महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील थकीत मालमत्ता कराची वसूली प्रभावीपणे होण्यासाठी व महानगरपालिकेची वसूलीत वाढ व्हावी म्हणुन थकीत मालमत्ता करावर विलंब शुल्क १० टक्के आकारण्यात येईल.

८.१ शासन निर्णय क्र.एम.यु.बी./एम.यु.पी.-२००९/१७९/प्र.क्र.४०/०९/नवि-१९, दि.५-२-२००९ अन्वये अवैध बांधकाम किंवा पूनर बांधकामास तथा इमारतीवर बसविण्या योग्य

असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी शास्ती ते बांधकाम जो पर्यंत अवैध म्हणून राहील तो पर्यंत वसूल करण्यात येईल.

## ०९. **विशेष सवलती** :-

**९.१** पाच वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्यास वार्षीक कराच्या सामान्य करात एक वर्षाची सूट देण्यात येईल.

**९.२** तीन वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्या एक वर्षातील वार्षीक कराच्या सामान्य करात ५०ऽ सूट देण्यात येईल.

**९.३** जे मालमत्ताधारक आपल्या मिळकतीत सोलर सिस्टीम लावतील त्यांना सामान्य करात चालु वर्षात ५% सुट देण्यात येईल.

**९.४** जे मालमत्ताधारक चालु वर्षाच्या खालील महिन्यात मालमत्ता कर भरणा करतील त्यांना सन २०१२-२०१३ करीता सामान्य करात पुढील प्रमाणे सूट देय राहील.

| | |
|---|---|
| एप्रिल | १०% |
| मे | ८% |
| जुन | ६% |
| जुलै | ४% |

ऑगस्ट ते मार्च सूट अनुज्ञेय होणार नाही व थकबाकीवर सूट देय राहणार नाही.

**९.५.** माजी सैनिकांना व स्वातंत्र्य सैनिकांना मागील वर्षाप्रमाणेच सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षात देखील निवासी वापर करीत असलेल्या केवळ एक मिळकतीस सामान्य करात १००% सूट दिली जाईल. सदरील सूट ही स्वतः किंवा त्यांचे पत्नी हयात असे पर्यंत लागु राहील.

**९.६** ग्रुप हौसिंग स्किम किंवा रो-हाऊसेस् स्किम जे विकासक स्वः खर्चाने विकास करतील अशा स्किम / योजनेला सामान्य करात ५०% सूट देय राहील. त्यासाठी महानगरपालिकेतर्फे भोगवटाप्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

**९.७** जे मालमत्ताधारक आपल्या मालमत्तेस रेन हार्वेस्टींग सिस्टीम (Rain Harvesting System) लागु करतील, अशा मालमत्ताधारकास सामान्य करात ५% सवलत देय होईल.

## १०. **कर आकारणी प्रणाली** :-

औरंगाबाद शहराचे वेगवेगळे भाग पाडुन त्याभागातील मिळकतीच्या / जागेचा मुल्यानुसार त्यांचे वाजवी भाडे आकारणी करण्यासाठी विचारात घेण्यात येते. अशा प्रकारचे भाग पाडुन मुल्यांकन हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणका मधील निवासी जागांच्या किमंती विचारात घेवुन औरंगाबाद शहराचे खालील प्रमाणे भाग करणे योग्य होईल. यामुळे औरंगाबाद शहरातील वेगवेगळया भागातील मूल्य (जागेचे) वेगवेगळे मिळवुन त्यानुसार

मिळकतीचा स्तर (वर्गीकरण) होवुन त्यानुसार मालमत्ता कर आकारणीसाठी दर आकारणे योग्य राहील.

**१०.१** सन २०१० चे महाराष्ट्र शासनाकडील सिध्द शिघ्र गणक (Ready Recknor) आधारे दिनांक १-४-२०१० पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सर्व मिळकतीसाठी चार विभाग खालील प्रमाणे करणे योग्य राहील.

| **अ. क्र.** | **विभाग** | **प्रचलित विभागानुसार मिळकतीचा दर /चौ.मी.** | **प्रस्तावित विभागानुसार मिळकतीचा दर /चौ.मी.** |
|---|---|---|---|
| **१** | अ | रू.११,०००/- पेक्षा जास्त | रू.१४,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती |
| **२** | ब | रू.९,५०० ते रू.१०,९९९/- | रू.११,००० ते रू.१३,९९९/- |
| **३** | क | रू.८,००० ते रू.९,४९९/- | रू.९,००० ते रू.१०,९९९/- |
| **४** | ड | रू.६,५०० ते ७,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या मिळकती) | रू.७००० ते ८,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) |

वरील प्रस्तावित दर हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणकामधील घेण्यात आलेले आहे.

त्यामुळे वरील भागासाठी शिघ्र शिध्द गणकातील दिलेल्या दरानुसार अ, ब, क, व ड असे चार भाग होतात. वरील कोणत्या भागात कोणती मिळकत येते, हे तपासता येईल. तसेच दरवर्षी दर बदलले तरी कर आकारणीसाठी हे विभाग पुढील चार वर्षासाठी असेच ठेवण्यात येतील.

**११. सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षामध्ये कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालील प्रमाणे वर्गीकरणानुसार व सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर आकारण्यात येत आहे. :-**

**११.१ निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर :-**

| **अ.क्र.** | **प्रकार** | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | आर.सी.सी.छत | रू.९.५०/- | रू.८.५०/- | रू.७.५०/- | रू.६.५०/- |
| **२** | गोल पटाव लाकडी छत | रू.७.५०/- | रू.७.००/- | रू.६.५०/- | रू.५.५०/- |
| **३** | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.६.५०/- | रू.६.००/- | रू.५.५०/- | रू.३.५०/- |
| **४** | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.४.००/- | रू.२.५०/- | रू.१.२५/- | रू.१/- |

**११.२ सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| **अ.क्र.** | **प्रकार** | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | आर.सी.सी.छत | रू.१२.५/- | रू.११/- | रू.९/- | रू.८/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- | रू.७/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.९/- | रू.७.५/- | रू.७/- | रू.४/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.५/- | रू.३/- | रू.२/- | रू.१.२५ /- |

**११.३ सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२२/- | रू.२०/- | रू.१८/- | रू.१७/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.७/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३/- | रू.६/- | रू.३/- | रू.२/- |

**११.४ व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२४/- | रू.२२ /- | रू.२१/- | रू.२०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८/- | रू.१६ /- | रू.१४/- | रू.८/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.६/- | रू.३.२५/- | रू.३/- |

**११.५ व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.३२/- | रू.२९/- | रू.२८/- | रू.२६/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२६/- | रू.२४/- | रू.२१/- | रू.१८/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२४/- | रू.२१/- | रू.१८/- | रू.११/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.२१/- | रू.८/- | रू.४/- | रू.३.५/- |

**११.६ औद्योगिक क्षेत्रासाठी सन २०१२-१३ साठी प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | बांधकामाचा वर्ग | सन १९९०-९१ चे अस्तित्वातील दर | | सन २०१२-१३ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| | | चौ.फुट | चौ.मी. | चौ.मी. |
| १ | कारखाना कार्यालय (आर.सी.सी.) | ०.६८ | ७.३२ | १४.६४ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | ०.४८ | ५.१६ | १०.३२ |
| | कारखाना कार्यशाळा (आर.सी.सी.) | ०.५४ | ५.८१ | ११.६२ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | ०.४२ | ४.५२ | ९.०४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | **कारखाना परिसरातील कॅन्टीन** | ०.७५ | ८.०७ | २४.०० |
| ३ | **गोदाम (आर.सी.सी.)** | ०.४५ | ४.८४ | ९.६८ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ०.४५ | ४.८४ | ९.६८ |
| | अर्ध पक्के | ०.२७ | २.९१ | ५.८२ |
| | कच्चे आणि विना छताचे | ०.१५ | १.६१ | ३.२२ |
| ४ | **शेड** | ०.१२ | १.२९ | २.५८ |
| ५ | सायकल स्टॅन्ड | ०.१८ | १.९३ | ३.८६ |
| ६ | **मशिनरी प्लॅन्ट (आर.सी.सी.)** | ०.५३ | ५.७० | ११.४० |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ०.४१ | ४.४१ | ८.८२ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ०.३३ | ३.५५ | ७.१० |
| | कच्चे बांधकाम | ०.१४ | १.५० | ३.१० |
| ७ | **निवासी क्षेत्र (आर.सी.सी.)** | ०.७५ | ८.०७ | १६.१४ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ०.६० | ६.४६ | १२.९२ |
| | अर्धे पक्के बांधकाम | ०.५३ | ५.७० | ११.४० |
| | कच्चे बांधकाम | ०.३० | ३.२२ | ६.४४ |
| ८ | **सहान जागा** | | | |
| | कारखाना वापर | ०.५६ | ६.०२ | १२.०४ |
| | रिकामे | ०.८४ | ९.०३ | ९.०३ |

**११.७ मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.१.२०/- | रू.१.००/- | रू.०.८०/- | रू.०.७०/- |

**११.८ मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.००/- | रू.२.५०/- | रू.२.००/- | रू.२/- |

**११.९ निवासेतर / व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१२.५०/- | रू.१०.५०/- | रू.९.००/- | रू.७/- |

**टिप :-** मोकळ्या जागेची आकारणी करतांना फक्त सामान्य कर आकारण्यात येईल.

**१२. मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २०११-२०१२ साठी प्रस्तावित व सन २०१२-१३ चे प्रचलित दर पुढील प्रमाणे :-**

| **अ.क्र.** | **कराचे नांव** | **कर योग्य मुल्य रूपये** | **सन २०११-१२ चे प्रचलित दर** | **सन २०१२-२०१३ साठी प्रस्तावित दर** |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% | ३७.५% |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | ४५% | ४५% |
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % | ३ % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | १० % | १० % |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | १० % | १० % |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % | १ % |
| ४ | अग्निशमन कर | | १.५ % | १.५ % |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २ % | २ % |
| ६ | पथकर | | २ % | २ % |
| ७ | जललाभ कर | | १.५ % | १.५ % |
| ८ | जलनिःसारण कर | | १.५ % | १.५ % |
| ९ | सेवरेज कर | १. निवासी वापरासाठी | १३ % | १३ % |
| | | २. निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी | २२ % | २२ % |
| **एकूण कर** | | निवासी | ५५.५% | ५५.५% |
| | | निवासेतर | ७९% | ७९% |
| | | व्यावसायीक | ८६.५% | ८६.५% |

**१३ शासनाचे कर :-** तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारणे योग्य.

वरील कर आकारणीच्या दर निश्चिती मध्ये अशंतः बदल प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. त्याबदलासह वरील प्रमाणे कर आकारणीसाठी करण्यात आलेल्या गटाचे दर सन २०१२-२०१३ साठी कायम करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :-**

श्री.गिरजाराम हळनोर :मालमत्ता संदर्भात २० फेब्रुवारीच्या पुर्वी निर्णय घेणे आवश्यक आहे हा प्रस्ताव ऐनवेळी जरी ठेवला असला तरी त्यावर सखोल अभ्यास झालेला नाही विनंती की यात दुरूस्त्या करणे आवश्यक आहे दुरूस्तीसह विषय मंजूर करावा.

श्री.संजय जोशी :मागील वेळेस उशीरा प्रस्ताव येतो त्यामूळे बराच वेळ चर्चा झाली होती मालमत्ता टॅक्सचा विषय प्रत्येक वेळेस उशीरा का येतो हा प्रस्ताव डिसेंबर जानेवारीच्या सभेत मंजूर व्हायला पाहिजे म्हणजे २० फेब्रुवारी पर्यत सुचना हरकती मागवून त्यानंतर हे लागू करू शकतो.परवा २० तारीख आहे ऐनवेळी आणणार मंजूरी घेणार हे योग्य नाही यानंतर वेळेवर ठराव यावा यात दुरूस्त्या आहे त्यासह मंजूर करावे.

श्री.गजानन बारवाल :धार्मीक स्थळाला आतापर्यंत करामध्ये सूट देत आलेलो आहे यात मंदीर, मस्जीद याचा कूठेही उल्लेख नाही ते यात समावेश होणार की नाही खुलासा घ्यावा.

मा.महापौर :हा विषय दुरूस्तीसह मंजूर करण्यात येतो.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व प्रशासनातर्फे सादर केलेल्या प्रस्तावामध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करण्यात येत आहे.

**०२. निवासेत्तर :-** वकीलाचे कार्यालये, कर सल्लागारांचे खाजगी कार्यालये, सर्व शाळा, सर्व महाविद्यालय तसेच सर्व शैक्षणिक संस्था व शैक्षणिक संस्थेशी संलग्न असलेली वस्तीगृहे, स्वतंत्र वस्तीगृहे.

**०३. व्यावसायीक :- ०१.** पेट्रोलपंप व त्यास संलग्न असलेली खुली जागा, व्यावसायीक दराने खुल्या जागेचे दर वेगळे आकारले जाईल. हॉटेल्स, लॉन्स (लग्न, समारंभासाठी वापरात येणारे लॉन्स) व्यावसायीक वापरासाठी मोकळया जागा, मॉल्स, सर्व प्रकारची दुकाने, **डॉक्टरांचे क्लिनीक,** खाजगी हॉस्पीटल्स्, कमर्शीयल पेड पार्कीगसाठी व्यावसायीक दराने कर आकारण्यात येईल. तसेच ज्या इमारती व्यावसायीक वापरासाठी भाड्याने दिल्या असतील अशा इमारतीनां सुध्दा व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल. **धार्मिक स्थळाच्या जागेवर जर व्यावसायीक वापर होत असेल तर त्यास व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल.**

**०७. नामांतर शुल्क :-**

**७.१** खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त / कागदपत्र आधारे नामांतर शुल्क कर योग्य मुल्यावर खालील प्रमाणे आकारण्यात येतील.

| निवासी व व्यावसायीक कर योग्य मुल्य | नामांतर शुल्क | |
|---|---|---|
| | निवासी | व्यावसायीक |
| रू. ०१ ते १०,०००/- | **रू.१०००/-** | **रू.२०००/-** |
| रू. १०,००१/- ते ५०,०००/- | **रू.३०००/-** | **रू.६०००/-** |
| रू. ५०,००१/- ते पुढे | **रू.६०००/-** | **रू.१२,०००/-** |
| **औद्योगिक वसाहतीतील मिळकती** | वरील प्रमाणे | **रू.५०,०००/-** |

**०९. विशेष सवलती :-**

९.६ ग्रुप हौसिंग स्किम किंवा रो-हाऊसेस् स्किम जे विकासक स्वः खर्चाने विकास करतील अशा स्किम / योजनेला सामान्य करात देय असलेली ५०% सूट यापुढे दि.१-४-२०१२ पासून देय राहणार नाही. तसेच पूर्वी विकसित केलेल्या व भोगवटाप्रमाणपत्र घेतलेल्या विकासकांनी विकसित केलेल्या कामांची देखभाल व दुरूस्तीचे काम करणे बंधनकारक असतांना ते करत नसल्याचे आढळुन आले आहे. त्यामुळे देखभाल दुरूस्तीची सर्व कामे महानगरपालिकेने करावी.

**११.** सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षामध्ये कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालील प्रमाणे वर्गीकरणानुसार व सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर आकारण्यात येत आहे. :-

११.२ सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- | रू.६/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.९/- | रू.८/- | रू.७/- | रू.५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.८/- | रू.३/- | रू.२/- | रू.१/- |

**११.३ (अ) सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२२/- | रू.२०/- | रू.१८/- | रू.१७/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.७/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३/- | रू.६/- | रू.३/- | रू.२/- |

**(ब) सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१३/- | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१२/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.११/- | रू.९/- | रू.८/- | रू.७/- |

**(क) <u>सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे</u> :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७/- | रू.१५/- | रू.१४/- | रू.१३/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६/- | रू.१४/- | रू.१३/- | रू.१२/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१३/- | रू.१२/- | रू.११/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |

११.५ व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२८/- | रू.२६/- | रू.२४/- | रू.२२/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२४/- | रू.२२/- | रू.१९/- | रू.१७/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.१०/- |

**११.६ औद्योगिक क्षेत्रासाठी सन २०१२-१३ साठी प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | बांधकामाचा वर्ग | सन २०१२-१३ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|
| | | चौ.मी. |
| १ | कारखाना कार्यालय (आर.सी.सी.) | १०.९८ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | ७.७४ |
| | कारखाना कार्यशाळा (आर.सी.सी.) | ८.७२ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | ६.७८ |
| २ | **कारखाना परिसरातील कॅन्टीन** | १८.०० |
| ३ | **गोदाम (आर.सी.सी.)** | ७.२६ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ७.२६ |
| | अर्ध पक्के | ४.३७ |
| | कच्चे आणि विना छताचे | २.४२ |
| ४ | **शेड** | १.९४ |
| ५ | सायकल स्टॅन्ड | २.०० |
| ६ | **मशिनरी प्लॅन्ट (आर.सी.सी.)** | ८.५५ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ६.६२ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ५.३३ |

| | | |
|---|---|---|
| | कच्चे बांधकाम | २.३३ |
| ७ | **निवासी क्षेत्र (आर.सी.सी.)** | १२.१० |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ९.६९ |
| | अर्धे पक्के बांधकाम | ८.५५ |
| | कच्चे बांधकाम | ४.८३ |
| ८ | **सहान जागा** | |
| | कारखाना वापर | ९.०३ |
| | रिकामे | ९.०३ |

**१२. मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २०१२-१३ चे दर पुढील प्रमाणे :-**

| अ.क्र. | कराचे नांव | कर योग्य मुल्य रूपये | सन २०१२-२०१३ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | ४५% |
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | १० % |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | १० % |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % |
| ४ | अग्निशमन कर | | १.५ % |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २ % |
| ६ | पथकर | | २ % |
| ७ | जललाभ कर | | १.५ % |
| ८ | जलनिःसारण कर | | १.५ % |
| ९ | सेवरेज कर | १. निवासी वापरासाठी | १० % |
| | | २. निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी | १५ % |
| | | **३. औद्योगिक वापरासाठी** | ५ % |
| | | **४. औद्योगिक वसाहतीतील निवासी वापर** | १० % |

वरील प्रमाणे प्रस्तावामध्ये दुरूस्ती करून कर आकारणीसाठी करण्यात आलेल्या गटाचे दर हे सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षासाठी लागु करण्यास दि.१-४-२०१२ पासून सुधारीत दरानुसार अंमलबजावणी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ६०६</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील युध्द पातळीवर चालू असलेल्या शहर विकास आराखडा योजना नुसार शहर विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असलेली रस्ता रुंदीकरण मोहिमेत ज्या मिळकत धारकांची रस्ता रुंदीकरणामध्ये अशंतः किंवा संपुर्ण घर/मालमत्ता/जागा बाधीत होत असुन ज्यांना राहण्यासाठी जागा नाही अशा नागरिकांचे सहानुभुतीपुर्वक पुनर्वसन करण्याचा मनपाचा मानस आहे.

मौजे हर्सुल येथे शासनाची स.न. २१६ व २१७ मध्ये असलेली १०.१७ हेक्टर आणि ९.१७ हेक्टर ही जमीन शहरातील रस्ता रुंदीकरणात बांधीत झालेल्या कुटुंबाचे पुनर्वसन करणेसाठी उपयुक्त असल्याने या ठिकाणी २० x ३० = ६०० चौरस फुटाचे प्लॉट पाडुन ज्या मिळकत धारकांची रस्ता रुंदीकरणामध्ये अशंतः किंवा संपुर्ण घर/मालमत्ता/जागा बाधीत होत आहे परंतु त्यांचेकडे मालकी हक्काचे कागदपत्रे पी.आर.कार्ड असलेले आणि ज्यांचेकडे मुद्रांकशुल्क (बॉंड) आहे अशा मिळकत धारकांचे पुनर्वसन या ठिकाणी करणे योग्य होईल.

सद्यस्थितीत महानगरपालिकेतर्फे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी (रमाई आवास योजना) घरकुल योजना राबविण्यात येत असुन सदर योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील कुटुंबाला रुपये २.०० लक्षचे २६९ चौरस फुट चटई क्षेत्राचे घरकुल बांधुन देण्यात येणार आहे. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील जे नागरिक दारिद्रय रेषेखालील आहे अशा नागरिकांना मोफत सदनिका बांधुन देण्यात येणार असुन जे नागरिक दारिद्रय रेषेखालील नाहीत अशा नागरिकांना लाभार्थी हिस्सा म्हणुन घरकुल किंमतीच्या १०% रक्कम म्हणजेच रुपये २०,०००/- चा भरणा करुन घेण्यात येणार आहे.

शहर विकास आराखड्यानुसार रस्ता रुंदीकरणामध्ये टाऊन हॉल ते मकई गेट, कैलास नगर स्मशानभूमी रोड, पीरबाजार येथील फुलेनगर ते एकतानगर तसेच शहरातील इतर भागातील रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत होणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातील नागरिकांसाठी मौजे हर्सुल येथील स.न. २१६ व २१७ या ठिकाणी विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे ग्रुप हौसींग योजना राबवुन प्रत्येक मिळकत धारकास रुपये २.०० लक्षचे २६९ चौरस फुट चटई क्षेत्राची सदनिका बांधुन देवुन सदर कामाचा खर्च रमाई आवास योजनेत समावेश करुन उक्त मिळकत धारकांचे पुनर्वसन या ठिकाणी करणेचा मनपाचा मानस आहे.

अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गा व्यतिरिक्त शहरातील रस्ता रुंदीकरण मोहिमेत बाधीत झालेल्या मिळकत धारकांचे मो. हर्सुल स.न. २१६ व २१७ या ठिकाणी २० x ३० = ६०० चौरस फुटाचे प्लॉट पाडुन अशा मिळकत धारकांचे पुनर्वसन करणेसाठी व अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातील नागरिकांना मौ. हर्सुल येथील स.न.२१६ व २१७ या जागेत विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे ग्रुप हौसींग योजना राबवुन रुपये २.०० लक्षचे २६९ चौरस फुट चटई क्षेत्राची सदनिका बांधुन देणेसाठी निविदा कार्यवाही करणेसाठी परवानगी मिळणे आणि सदर योजनेचा प्रकल्प आराखडा तयार करणे, प्रत्यक्ष कामावर देखरेख ठेवणेसाठी एकूण प्रकल्प किंमतीच्या २% या दराने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) नियुक्त करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करणेसाठी प्रस्ताव मा. सर्व साधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.गिरजाराम हळनोर : प्रस्ताव मंजूरकरण्यास हरकत नाही पुर्नवसन करतांना ज्या नियम व अटी असतील त्यांची अमलबजावणी व्हावी कुणीही गरीब बेघर झालेले कुटूंब यातून वंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी.

श्री.गजानन बारवाल :ज्यांचे पुर्नवसन करणार आहे त्यांना रजिस्ट्री,बॉण्डवर सर्व कागदपत्राची पुर्तता करून दयावे.

मा.महापौर :विषय मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मंजूर विकास योजनेनुसार रस्ता रूंदीकरणाच्या मोहिमेत ज्या मिळकत धारकांची मिळकत /घर /मालमत्ता अंशतः अथवा पुर्णतः बाधित होत असून ज्यांना राहण्यासाठी जागा नांही अश्या नागरिकांचे पुनःर्वसन करण्यास मान्यता देण्यात येत असून या अंतर्गत टाऊन हॉल ते मकईगेट, कैलासनगर स्मशानभूमीरोड, पीरबाजार येथील फुलेनगर ते एकतानगर आणि शहरातिल इतर भागातिल रस्ता रूंदी करणामध्ये बाधित होणा-या व्यक्तींचे अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातिल नागरिकांचे प्रस्तावात नमुद प्रत्येक मिळकत धारकास २ लक्षाचे २६९ चौ.फुट चटईक्षेत्राचे सदनिका रमाई आवास योजने अंतर्गत बांधून देण्यास तसेच अनुसूचीत जाती व नवबौध्द व्यतिरिक्त रस्ता रूंदी करण्यात बाधित मिळकत धारकांचे प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे पुनःर्वसन करण्यास मंजूरी देण्यात येते तसेच योजनेचा प्रकल्प आराखडा तयार करणेस व प्रत्यक्ष कामावर देखरेख ठेवणेसाठी एकूण प्रकल्प किंमतीच्या २% या दराने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) नियुक्त करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करणेस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.गजानन बारवाल :उर्वरीत ऐनवेळचे विषय पुढील बैठकीत घेण्यात यावे.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगरसचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (३५)

दिनांक १८/०२/२०१२ रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेत विचारण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ व सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.९६ अन्वये.

**प्रश्नांची यादी**

**स.पालिका सदस्य श्री कृष्णा एस. बनकर**

**प्रश्न क्र.१०१:-**

१) मनपा अंतर्गत शहरात बांधलेले गाळे किती? किती नागरीकांना अधिकृत गाळे देण्यांत आलेले आहे? किती नागरीक अनाधिकृतपणे गाळेधारक आहे? सद्यस्थितीत रिकामे गाळे किती व कोणकोणत्या ठिकाणी?

२) मनपाचे शहरातील किती गाळया संदर्भात मा.न्यायालयात वाद सुरू आहे?

३) गाळेधारकांना किती वर्षाच्या लीजवर गाळे देण्यांत आलेले आहे? प्रत्येकाकडून किती अनामत रक्कम भरून घेण्यांत आलेली आहे. तपशिलवार माहिती देण्यांत यावी.

४) शहरातील मनपाच्या मालकीच्या मोकळया व बांधकाम झालेल्या जागा, सभागृहे किती?सिडको हस्तांतरणानंतर मनपास किती मोकळया जागा, सभागृहे मिळाली. सद्यस्थितीत सेवाभावी संस्थांना किंवा इतर कोणत्या नागरीकांना भाडयाने/लीजवर देण्यांत आलेल्या जागा किती? या जागेसाठी भाडे आकारणी किती करण्यांत आलेली आहे? यासह सविस्तर माहिती देण्यात यावी. नेहरू भवन येथे बांधलेल्या हजेरी सेंटर सारखे किती हजेरी सेंटर बांधण्यात आलेले आहे? किती उपयोगात आहे? हजेरी सेंटरचा वापर होतो का? नेहरू भवन येथे हजेरी सेंटरच्या शेजारी बांधण्यात आलेला हजेरी संटर सारखा गाळा १० वर्षापासून कोणाच्या ताब्यात आहे? त्यापासून किती भाडे प्राप्त झाले. कुणाच्या ताब्यात नसेल तर अनाधिकृतपणे त्या ठिकाणी कुणी राहते का?

५) मनपाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी किती निवासस्थाने बांधण्यात आलेली आहे. कोणकोणत्या ठिकाणी बांधलेली आहे. निवासस्थाने देण्यांत आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नांवासह सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यांत यावी. निवासस्थाने देतांना सदर निवासस्थाने वर्गवारी नुसारच देण्यांत आलेले आहे का? अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनातुन घरभाडे वसुल करण्यांत येतात का? सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यांत यावी. निवासस्थाने मिळण्यासाठी किती कर्मचाऱ्यांची मागणी आहे, त्यांची यादी देण्यांत यावी. निवासस्थानामध्ये अनाधिकृतपणे राहात असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी उपलब्ध करून देण्यांत यावी.

**सहाय्यक संचालक नगर रचना:-**

**उत्तर :-**

दुकाने गाळे,निवासस्थाने ३ बाबत अंतरीत खुलासा /उत्तर देण्यात येत असुन या व इतर मुद्दे सभागृह, खुल्या जागा ३ बाबत सविस्तर माहिती एकत्रित करुन उत्तर देण्यात येईल.

१) महानगरपालिका अंतर्गत शहरात बाधलेल्या गाळे ६९५ असुन यापैकी नागरीकांना ६६५ इतकेच गाळे देण्यात आलेले आहेत. रिक्त गाळे ३० आहेत. गाळे संबंधाने प्रकरणी न्यायालयीन वाद चालु आहे. ११३ गाळया संबंधाने मा.उच्च न्यायालयात वाद आहे. काही प्रकरणांत लिज कालावधी वेगवेगळा आहे. तथापि, सर्वसाधारणपणे २००१ पुर्वी ३० वर्षाचे कालावधी करीता करारनामा करुन गाळे लिजवर दिलेले आहेत. मात्र त्यानंतर महानगरपालिका धोरणा नुसार ३ वर्षाचे कालावधी करीता करारनामा करुन (करारनुतनी करण्याचे अटीवर) देण्यात येत आहेत. दुकानासाठी गनामत रक्कम म्हणुन मासीक भाड्याचे बारापट रक्कम घेण्यात येते. सिडको हस्तांतरणात ४ कम्युनीटी सेंटर व सोबत जोडलेल्या यादीनुसार खुल्या जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत झाल्या.

२) महानगरपालिका कर्मचारी/ अधिकारी करीता एकुण १६१ निवासस्थाने आहे. निवासस्थाने वापरत असलेल्या कर्मचारी/ अधिकारी यादी सोबत आहे. त्यांचे वेतनातुन नियमित घरभाडे,घरभाडे भरणा वसुल करण्यात येते. एकुण मागणी २९ वर्षाची आहे.

**प्रश्न क्रमांक:१०२:-**

**स.स.श्री.अब्दुल सिकंदर अब्दुल साजेद:**

**१)** पशुसंवर्धन अधिकारी, मनपा औरंगाबाद यांच्याकडून दिनांक ५.८.२०११ पासुन ०१.०१.२०१२ पर्यंत किती मासे/मटन/बीफ/पक्षी (कुक्कुट) मांस विक्रीचे परवाने देण्यात आले.

**२)** मासे/मटन/बीफ/पक्षी (कुक्कुट) मांस विक्री परवाना देतांना नियमानुसार कोणकोणते कागदपत्र घेण्यात येतात.

३) मासे/मटन/बीफ/पक्षी (कुक्कुट) मांसविक्री परवाना विक्रीसाठी वार्षीक फिस किती व ती कोणत्या नियमानुसार ठरविण्यात आली.

४) दिनांक ०५/०८/२०११ ते ०१/०१/२०१२ पर्यंत परवाना फीस किती जमा करण्यात आली व ती मनपा फंडात जमा केली किंवा शासनाच्या महसुल विभागात जमा केली?

५) पशुसंवर्धन अधिकारी, मनपा औरंगाबाद यांना कोणत्या नियमानिहाय मासे/मटन/बीफ/पक्षी (कुक्कुट) मांस विक्री दुकानांना परवाना देण्याचा अधिकार आहे. नियमाच्या प्रतीसह देण्यात यावे.

**उत्तर : अप्राप्त.**

**नगरसचिव**
महानगरपालिका औरंगाबाद